कोणाचा आदेश चालेल?

इनामुर्रहमान खान

अनुवादक

मुहम्मद शफी अन्सारी

"अल्लाह, असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने"

प्रस्तावना

पवित्र कुरआनातील एक अध्याय "अल हदीद"च्या पहिल्या उक्ती (आयतीचे) शब्द "वहुवल अजीजुल् हकीम"वर भाष्य करताना 'तफ्हीमुल कुरआन' या कुरआनभाष्य ग्रंथात एक गोष्ट ही सांगितली गेली आहे :

"पवित्र कुरआनात सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या अजीज (प्रभुत्वशाली) या गुणविशेषासोबत हकीम (बुद्धिमान), अलीम (ज्ञानी), रहीम (दयावान), गफूर (क्षमाशील), हमीद (स्तुत्य) आणि वह्हाब (नि:स्पृह दाता) इत्यादी गुणविशेषांचा उल्लेख अपरिहार्यत: केला गेला आहे. अशासाठी की, माणसाने हे जाणून घ्यावे की जो ईश्वर या सर्व सृष्टीवर शासन करीत आहे तो एकीकडे तर असा परिपूर्ण सत्ताधिकार बाळगतो की जमिनीपासून आकाशापर्यंत कोणीही त्याच्या निर्णयांना लागू होण्यापासून रोखू शकत नाही, परंतु दुसऱ्या बाजूने तो बुद्धिकौशल्य युक्त आहे. त्याचा प्रत्येक फैसला पूर्णत: बुद्धिकौशल्यावर आधारित असतो. तो सर्वज्ञही आहे. जो काही निर्णय तो करतो अगदी उचित ज्ञानानुसार करतो. तो रहीमही आहे. आपल्या अमर्याद सामर्थ्याचा व सत्ताधिकाराचा निर्दयतापूर्वक वापर करीत नाही. तो गफूर अर्थात क्षमाशीलही आहे. आपल्या अधीन असलेल्यांची अब्रू वेशीवर टांगत नाही तर ती झाकून त्यांच्या अपराधांना दृष्टिआड करत राहतो. तो वह्हाबदेखील आहे. आपल्या दासांशी कृपणतेचा नव्हे तर अत्याधिक उदारतेचा व्यवहार करतो आणि तो हमीद म्हणजे स्तुत्यही आहे. सर्व प्रशंसनीय गुणविशेष आणि सर्वोच्चता त्याच्या ठायी एकवटलेली आहे."

"पवित्र कुरआनच्या या निवेदनाचे पूर्ण महत्त्व ते लोक चांगल्या प्रकारे समजू शकतात. साम्राज्य सत्ता (Soverenighty)च्या प्रश्नावर राजकारणाचे तत्त्वज्ञान आणि विधि-तत्त्वज्ञानाच्या चर्चेशी परिचित आहेत. राज्यसत्ता यालाच म्हणतात की, सर्व सत्ताधिकार बाळगणारा शासक अमर्याद सत्ताधिकाराचा स्वामी असावा. कोणतीही आंतरिक व बाह्यशक्ती त्याच्या आदेश व निर्णयास लागू होण्यापासून रोखणारी किंवा त्याला परिवर्तित करणारी किंवा त्यावर फेरनजर

टाकणारी नसावी आणि कोणाकरिताही त्याच्या आज्ञापालनाशिवाय दुसरा मार्ग नसावा. अशा प्रकारच्या अमर्यादित सत्ताधिकाराची कल्पना करताच मानवबुद्धी अनिवार्यत: हे इच्छिते की असा सत्ताधिकार ज्या कुणाला प्राप्त आहे तो व्यंगदोषविरहित आणि ज्ञानबुद्धिकौशल्यात परिपूर्ण असला पाहिजे. कारण जर असा सत्ताधिकार बाळगणारा नादान, बुद्धिहीन, अज्ञानी, निर्दय आणि कृपण असेल तर त्याची राज्यसत्ता पूर्णत: अत्याचार व उपद्रवपूर्ण असेल. यास्तव ज्या तत्त्ववेत्त्यांनी एखादा मनुष्य किंवा एखादी मानवी संस्था किंवा मानव समूहाला सत्ताधिकाराचा स्वामी ठरविले आहे त्यांना हे मान्य करावे लागले की तो चूक करणारा नसेल.

परंतु उघड आहे की, अमर्याद राज्यसत्ता खरोखर एखाद्या मानवीय सत्तेला प्राप्त होऊ शकत नाही आणि हे कदापि शक्य नाही की एखाद्या बादशहा किंवा पार्लमेंट किंवा राष्ट्र किंवा पक्षाला मर्यादित स्वरूपात जी राज्यसत्ता लाभली असेल तिला तो निर्दोष व कसलीही चूक न करता चालवू शकेल. कारण अशी राज्यसत्ता जिच्यात नादानीचे मिश्रण नसावे आणि ना असे ज्ञान जे समस्त संबंधित सत्यांवर वर्चस्वशाली असावे, मुळातच संपूर्ण मानवजातीला प्राप्त नाही. कोठेही ती माणसांपैकी एखाद्या मनुष्याला किंवा संस्थेला या राष्ट्राला लाभणे अशक्यप्राय आहे. अशा प्रकारे मानव जोपर्यंत मानव आहे तोपर्यंत त्याचे स्वार्थ, अहंकार, भय, लालूच, इच्छा-अभिलाषा, पक्षपात, भावनातिरेक आणि प्रेम-तिरस्कार या दोषांपासून मुक्त आणि उच्चतम होणे हेही असंभव आहे. या सत्यांना एखादा मनुष्य दृष्टिपथात राखून विचार चिंतन करेल तर त्याला हे जाणवेल की पवित्र कुरआन आपल्या या निवेदनात वास्तविक शासनाची अगदी उचित आणि परिपूर्ण प्रणाली सादर करीत आहे. कुरआनाचे फर्मान असे की, 'अज़ीज़' अर्थात सर्व सत्ताधिकाराचा स्वामी या सकल सृष्टीत सर्वश्रेष्ठ अल्लाहखेरीज दुसरा कोणीही नाही. आणि या अमर्याद राज्यसत्तेला तोच एक चालविणारा असा आहे, जो व्यंगविरहित आहे! बुद्धिमान व सर्वज्ञ आहे, दयाळू आणि क्षमाशील आहे तसेच सर्वस्तुत्य आणि नि:स्पृह दाताही आहे.

तद्वतच 'सूरह ह्श्र' या अध्यायावर भाष्य करताना एका ठिकाणी तफ्हीमुल कुरआनचे कथन आहे,

''ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे की पवित्रता, दोषहीनता वस्तुत: शासकत्वाच्या प्राथमिक गरजांपैकी आहे. मानवाची बुद्धी आणि स्वभाव हे अमान्य करते की शासकत्व बाळगणारी एक शक्ती आहे जी खोडसर व वाईट वर्तनाची आणि वाईट प्रवृत्तीची आहे; जिच्या ठायी घृणास्पद अवगुण आढळून येतात. त्या शासनाधिकाराने प्रजेचे भले होण्याऐवजी वाईट गोष्टींचे संकट शिरावर लोंबकळत असावेत. याच कारणास्तव मनुष्य जिथे जिथे शासकत्वाला प्रभावित ठरवितो, तिथे पवित्रता नसली तरी ती अस्तित्वात असल्याचे गृहीत धरतो. कारण व्यंगदोषविरहित सत्ताधिकार अगदी कल्पना न करण्यासारखा आहे. परंतु उघड आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या खेरीज वास्तविक कोणीही उच्च सत्ताधिकारी व्यंगदोषविरहित नाही अन् होऊही शकत नाही. व्यक्तिगत राजेशाही असो किंवा लोकतंत्राचे शासन किंवा सामाईक व्यवस्थेची शासन यंत्रणा किंवा मानवीय राज्यसत्तेचे अन्य एखादे स्वरूप. काहीही असो, त्याच्या बाबतीत व्यंगदोषविरहिततेची कल्पनाही केली जाऊ शकत नाही.''

सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या गुणविशेषांचे हेच महत्त्व आणि विशेषत्व आहे जे वर दिलेल्या परिच्छेदांमध्ये स्पष्ट केले गेले आहे आणि जे सर्वसामान्यत: अदृश्य आहेत. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या गुणविशेषांच्या संबंधाने मुस्लिमांच्या सामुदायिक कार्यशैलीने काही अशा साशंक आणि नकळत गोष्टी झळकतात की अल्लाह आमचे रक्षण करो, अल्लाहदेखील जगातल्या विवश लाचार बादशहांप्रमाणे आपल्या प्रशंसेने खुश होत असेल ? यास्तव त्याचे स्तुतीचे गुणगान करीत जा ? या गुणविशेषांना मानल्यानंतर आमच्या व्यक्तिगत आणि सामुदायिक जीवनाचा कल कसा असला पाहिजे ? ही विमनस्क करणारी बाब आहे.

सादर केल्या जाणाऱ्या भाषणांमध्ये तौहीद (एकेश्वरवादा)च्या याच पैलूस आपल्या शैलीत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

"अल्लाह, असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने"

कोणाचा आदेश चालेल?

हे भाषण मध्य प्रदेशच्या विभागीय संमेलनात जबलपूर येथे केले गेले होते आणि आता अल्पशा वाढीसह इथे प्रकाशित केले जात आहे.

सर्वश्रेष्ठ अल्लाहची प्रशंसा आणि त्याचे प्रेषित आदरणीय मुहम्मद (स) यांच्यावर शांती व समृद्धी असो. आदरणीय बंधूंनो! जमाते इस्लामीविषयी ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे की या जमातचे आवाहन विशुद्ध कुरआनी आवाहन आहे.

मी या गोष्टीवर जोर देऊन सांगतो की, जमाते इस्लामी अगदी तेच सांगते जे कुरआनने सांगितले आहे आणि तेच करू इच्छिते, जे कुरआनला अपेक्षित आहे. ज्याकरिता समस्त प्रेषितांचे आगमन झाले आणि शेवटी ज्याचा नमुना प्रेषित मुहम्मद (स) यांनी सादर केला. याहून ना कणभर कमी, ना कणभर जास्त. ही गोष्ट अभिमानाच्या भावनेने किंवा घोषणा म्हणून नव्हे तर एवढ्यासाठी जोर देऊन सांगितली जात आहे की, जे लोक आमचा आणि त्या कार्याचा अभ्यास करू इच्छितात, जे आम्ही सध्या करत आहोत व यापुढे करू इच्छितो, त्यांनी आमच्याकडून कुरआन व प्रेषित आचरणाशी कमी किंवा जास्त अशा कसल्याही गोष्टीची आशा करू नये. आम्ही कुरआन आणि प्रेषित आचरणाखेरीज अन्य कोणत्याही गोष्टीस मूळस्रोत मानत नाही. ना यांच्याखेरीज अन्य एखाद्या गोष्टीत आमच्यासाठी अपील आहे. थोडक्यात असे की, आम्ही जी साद घालत आहोत आणि ईश्वराच्या दासांना ज्या गोष्टीचे आवाहन करीत आहोत ती कुरआनचीच साद आणि त्याचेच आवाहन आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, पवित्र कुरआनचा विषय आणि त्याचे संबोधन मनुष्यमात्र आहे. तो मनुष्य जो एकीकडे सृष्टीच्या सुप्त रहस्यांना अनावरित करतो, चंद्रावर ध्वजारोहण करून आला तरी दुसरीकडे कृमीकीटक, झाडे

आणि दगडांपुढे साष्टांग नमस्कार घालतो. कुरआनचा विषय व त्याला अभिप्रेत असलेला मानव आहे म्हणून त्याच्यासाठी प्रथम ग्रंथांचे अवतरण केले गेले. त्याच्यासाठी प्रेषितांना पाठविले गेले. तेव्हा लक्षात घेतले पाहिजे की मानव मोठा मौल्यवान आहे. हाच तो माणूस आहे ज्याला देवदूतांनी साष्टांग नमस्कार केला. हाच तो मानव महाशय आहे, ज्याच्यासाठी जमिनीच्या कणांपासून सूर्य, चंद्र, तारे वगैरे मोठमोठ्या वस्तूंना कार्यरत केले गेले. याच मानवाकरिता या अवाढव्य सृष्टीचा व्याप पसरवून त्याला ईश्वराने आपला प्रतिनिधी (नायब) बनवून जगात पाठविले. अशा या मानवाबद्दल हकीम मुशरफ या फारसी कवीने मर्मिक शब्दात म्हटले आहे -

कुशायद राज व खुद राज अस्त आदम

अर्थ : हा मानव रहस्यभेद खोलणारा आहे आणि स्वत: एक रहस्य आहे.

मी स्वत: तर दृष्टीने कमाल दर्जाचा, तुच्छ, दुर्बल अस्तित्व आणि अगदी मामुली मनुष्य आहे. परंतु मानवजातीचा एक घटक या नात्याने मोठा मौल्यवान आहे. मीच तो, ज्याच्यासाठी ईश-ग्रंथांना अवतरित केले गेले. मीच तो, ज्याच्यासाठी ईश्वराने आपल्या संदेशवाहकांना अर्थात प्रेषितांना पाठविले. तो मीच आहे, ज्याच्यासाठी गरजपूर्तीच्या वस्तूंची भांडारे भरून जमिनीचे अंथरूण पसरविले गेले. माझ्याकरिताच सूर्य-चंद्रादी, ग्रह-नक्षत्रे भ्रमण करीत आहेत. सृष्टीच्या समस्त निर्मितीमध्ये सर्वश्रेष्ठ निर्मिती असलेला हाच मानव जर स्वत:ला विसरेल आणि त्याचे स्वत्व निद्रिस्त होईल तर आपल्या इच्छा-आकांक्षांना व आपल्या इच्छापूर्ती करणाऱ्या यंत्र साधनांचीदेखील पूजा करू लागतो. आपल्या भावनांना व जाणिवांना उपास्य ठरवतो. आणि जर त्याने स्वत:ला नीट ओळखले व त्याचे स्वत्व जागृत झाले तर अकस्मात तो उद्‌गारेल -

जचते नहीं बख्शे हुए फिर्दोस नज़र में। जन्नत मेरी पिनहा है मेरे खून जिगर में।।

या महान सृष्टीनिर्मितीच्या व्यक्तित्वाचे पृथक्करण करून पाहूया. ज्याला यथार्थपणे छोटे विश्व म्हटले गेले आहे. हे मानव महाशय, जे उन्नती व अवनतीचे, बुद्धिकौशल्याचे, ज्ञान व अज्ञानाचे आणि देवदूतांसमान उच्च गुणांचे व पशुतुल्य

अवगुणांचे आश्चर्यकारक मिश्रण बनले आहेत. शेवटी स्वत: मानव आहेत तरी काय ?

माणसाच्या वैशिष्ट्यांना जर सूक्ष्म नजरेने पाहिल्यास त्याचे प्रथम वैशिष्ट्य हे दिसून येईल की त्याच्या स्वभावात आणि त्याच्या वृत्तीत धार्मिकता खोलवर रुजलेली आहे. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात ही जी धार्मिक रंगविविधता दिसून येते. येथपावेतो की तिची धार्मिक भावनाच मोठमोठ्या कटकारस्थांना बळी पडत राहिली. आणि कोणाच्या तरी पुढे नतमस्तक होत राहिली आणि कुणा न कुणाच्या हस्ते वापरली जात राहिली. हा त्याच्या त्याच धार्मिक स्वभावाचा चमत्कार आहे. ही बाब अनुमानापलीकडची आहे की मानवांच्या आत्म्यांनी एखाद्या वेळी कॉन्फरन्स घेऊन हे ठरवले असेल की आम्ही ज्या काळात ज्या ज्या ठिकाणी जाऊ, तिथे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात धर्म अवश्य मानू. आता याचे उत्तर याखेरीज आणखी काय असू शकते की दास्यत्वाची भावना मानव स्वभावात समाविष्ट आहे. याच भावनेने तो आपले शिर कोणाच्या ना कोणाच्या समोर आंतरिक प्रेरणेने झुकवू इच्छितो. तो आपल्या अंत:करणात एखादे मनमोहक रूप सजवू इच्छितो. ज्यावर त्याने प्रेम करावे, ज्याच्यापुढे नतमस्तक व्हावे, ज्याच्यासाठी त्याने तहानभूक विसरावी, ज्याच्याभोवती फिरत राहावे, ज्याच्या नावाने आपले धन खर्च करावे, ज्याच्यासाठी बलिदान द्यावे, ज्याच्यासाठी सर्वस्व अर्पित करण्याची भावना मनात राखावी. याच कारणास्तव या दास्यत्व भावनेने आपल्यास प्रकट करण्यासाठी जवळजवळ सर्वच धर्मात मिळतीजुळती रूपे धारण केली आहेत.

प्रत्येक धर्मात झुकण्याची अर्थात रूकूअची स्वरूपे मिळतीजुळती आहेत. उपास्यासमोर शिरसावंद्य होण्याची रूपे ही काहीशी समान आहेत. उपास्याखातर उपाशी राहण्याचे नाव, मग ते व्रत-उपवास असो किंवा अन्य काही, हे प्रत्येक धर्मात आहे. उपास्याच्या नावाने केले जाणारे बलिदान यास 'बळी' म्हटले जात असो किंवा आणखी काही, सर्वत्र हे आढळून येते. हीच स्थिती भोवती फिरण्याची, तवाफ किंवा प्रदक्षिणा करण्याची किंवा दुआ, प्रार्थना मागण्याची आहे.

तात्पर्य, प्रत्येक धर्मात ही भावना आहे. किंबहुना हे कथन उचित ठरेल की

हीच भावना धर्माचा मूलाधार आहे. प्रत्येक धर्मात हिचा रोख वेगळा आणि हिची दिशा भिन्न असली तरी इस्लामला अभिप्रेत असलेला ईश्वर (अल्लाह) दास्यत्वाच्या या सर्व भावनांना आणि तिच्या समस्त स्वरूपांना आपल्यासाठी खास ठरवितो. इस्लाम म्हणतो, तुम्ही ईश्वरानंतर त्याच्या सृष्टिमात्रात सर्वश्रेष्ठ आहात. तुमच्यापेक्षा या सृष्टीत अधिक श्रेष्ठ कोण आहे, ज्याच्यापुढे तुम्ही लोटांगण घालावे? कोण या योग्यतेचा आहे की तुम्ही गरजपूर्तीकरिता त्याच्यापुढे हात पसरावेत? सर्वशक्तिमान अल्लाहखेरीज कुणात हे सामर्थ्य आहे की तुमचे बिघडलेले कार्य तडीस न्यावे?

इस्लाम म्हणतो, दास्यत्वाच्या या पवित्र भावना तुमच्या मनात उचंबळत आहेत त्या तर अगदी स्वाभाविक आणि उचित आहेत. परंतु त्यांचे केंद्रस्थान ईश्वरच असला पाहिजे. तुमच्या समस्त धार्मिक कृत्यांची आस केवळ ईश्वराची प्रसन्नता असली पाहिजे. कारण त्यानेच तुम्हाला अस्तित्व बहाल केले आहे. तोच आपल्या ईशत्वाने तुमचे अस्तित्व कायम राखून आहे आणि शेवटी त्याच्याच समोर तुम्हाला हजर व्हायचे आहे आणि जर त्याला सोडून तुम्ही अन्य कोणाची प्रसन्नता प्राप्त करू इच्छित असाल, त्याला सोडून दुसऱ्या कोणापुढे आपल्या गरजेसाठी हात पसरवाल, दुसऱ्या कोणासाठी समर्पित होण्याची भावना राखाल तर ही घोर कृतघ्नता आणि अतिशय निकृष्ट दर्जाचे पातक तर ठरेलच, शिवाय तुमच्या उच्च आणि प्रतिष्ठित शिराचा सक्त अवमानही ठरेल. मग या घोर पातकाचा परिणामही तोच होईल, जो कृतघ्नतेचा व कृतघ्न लोकांचा व्हायला हवा. इथे कोणी अन्नदाता, कोणी वली (दोस्त) व कार्यसाधक, कोणी दुआ-प्रार्थना ऐकणारा आणि गाऱ्हाणे ऐकणारा नाही. कोणी इथे स्वयंश्रेष्ठ नाही. जमिनीपासून थेट आकाशापर्यंत सर्व बंदे (दास) आहेत. ईश्वर आणि पालनहार फक्त एकमेव आहे. म्हणूनच तझे हे मस्तक दुसऱ्या कोणासमोर मुळीच झुकता कामा नये. मात्र आपल्या पालनकर्त्या ईश्वरासमोर अवश्य झुकले पाहिजे.

मान्यवरांनो! हा आहे मनुष्य स्वभावाचा एक पैलू. याचा आणखी दुसरा पैलू आहे आणि तो दुसरा पैलू असा की मनुष्य एक सामुदायिक अस्तित्व आहे. तो एकटा जन्माला आला असला तरी एकटा राहत नाही आणि राहूही शकत नाही.

त्याच्या स्वभावाची निकड ही आहे की आपल्या सजातीयांशी त्याने मिळून मिसळून राहावे. दोन व्यक्तींच्या सामुदायिक कृतीतूनच तो जन्मास आला. अशा प्रकारे दोन व्यक्तींच्या मिलनाने कुटुंब निर्माण होते. कुटुंबापासून कबिला बनतो. कबिल्यापासून जनजाती आणि राष्ट्र घडते. मग अशा प्रकारे एक मानव-विश्व अस्तित्वात येते आणि आता तर या मानव विश्वाने प्रगतीचे शिखर गाठून समाजरूप धारण केले आहे. युरोप, अमेरिका आणि आशिया खंडाचे लोक अशा प्रकारे एकत्र जमतात. ज्या प्रकारे पूर्वी गावा-गावातील लोक चव्हाट्यावर एकत्र येत. परंतु या सामुदायिकतेने मानवाची एक महत्त्वपूर्ण गरज प्रकटपणे समोर येते. यांचे एकमेकांशी असंख्य संबंध असतात. या संबंधांच्या परिणामी असंख्य गुंतागुंती निर्माण होतात. मोठमोठ्या समस्या उभ्या राहतात. कोणाचे काय हक्क आहेत, कोणाच्या काय जबाबदाऱ्या आहेत, कोणाला कोणत्या मर्यादित राहिले पाहिजे, अर्थार्जनाचे योग्य मार्ग कोणते, उत्पत्तीच्या साधनांना कशा प्रकारे नियंत्रित केले जावे, कोणत्या पद्धतीत लाभ आहे आणि कोणत्या पद्धतीत हानी, वैध काय आणि अवैध काय ? तात्पर्य, माणसांच्या एकत्रित वास्तव्याने पावलापावलांवर प्रश्न आणि समस्या उद्भवतात. आता या प्रश्नांची उत्तरे कोणी द्यावीत आणि त्यांच्या एकत्रित राहण्याच्या मर्यादा कोणी निश्चित कराव्यात ही मानवाची आपली स्वत:ची एक मौलिक गरज आहे. त्याच्या सामुदायिक गरजेची निकड अशी की, कोणी त्यांचा मार्गदर्शक असावा, जो त्यांना दाखवील की तुमचे हे हक्क आहेत आणि या मर्यादा आहेत. मग या सर्वांना आपापल्या हद्दीत बलपूर्वक राखील यासाठी की व्यक्तींनी आपापल्या हद्दीत राहावे आणि कोणी आपली हद्द ओलांडून दुसऱ्याचा हक्क हिरावून घेऊ नये व इतरांवर अत्याचार करू नयेत.

ही एक अशी गरज आहे की, जिच्याविना एखादा मानव समाज जिवंत राहणे तर दूर, परंतु मानवसमाज बनणेच अशक्य. आजच्या काळात व इतिहासात अशा कोणत्याही मानव समाजाचे चिन्ह आढळत नाही, ज्यावर कोणाचा तरी आदेश चालत नसावा किंवा बेबंदशाहीच्या अवस्थेत असावा. प्रत्येक काळात, प्रत्येक समाजात कोणत्या ना कोणत्या शासन शक्तीचा आदेश चालत राहिला

आहे. ज्याने आपल्या पद्धतीने समाज यंत्रणा चालवली आणि त्याला आपल्या निर्धारित मर्यादांच्या अधीन राखले आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर प्रत्येक समाजावर कोणा ना कोणाची मर्जी चालली. आता कोणाची मर्जी कशी आणि का म्हणून चालली ही एक प्रदीर्घ आणि शोकमय कथा आहे, जिचे वर्णन करणे ना सोपे आहे ना तिला या ठिकाणी वाव आहे. तथापि, या दीर्घ शोकांतिकेतून हे निश्चितच उघडकीस येते की, ईश्वराच्या दासांवर आपली मर्जी आणि आपला आदेश चालवणे आणि इतरांना आपल्यापुढे नतमस्तक होण्यास भाग पाडणे इतकी मजेदार व अधिक लज्जतदार दुसरी गोष्ट मानव स्वभाव आजपर्यंत शोधू शकला नाही. नीट बारकाईने पाहिल्यास स्पष्ट दिसून येईल की, सासू-सुनेच्या भांडणांपासून देशा-देशांतील युद्धे आणि आंतरराष्ट्रीय ताण-तणावांपर्यंत या विचारसरणीने भूगोलातील नकाशे बदलून टाकले. फक्त एकच गोष्ट कार्यरत राहिली आणि ती ही की ''आदेश कोणाचा चालावा?''

सासू म्हणते घर माझे आहे. घरात माझीच सत्ता चालली पाहिजे. त्यावर सून म्हणते, आता माझा काळ आहे तेव्हा मी म्हणेन ती पूर्व दिशा. एक राजा म्हणायचा, ''माझा आदेश चालेल'' तर दुसरा म्हणायचा, ''माझा आदेश चालेल.'' एक राष्ट्र म्हणते, ''माझा आदेश चालेल'' तर दुसरे राष्ट्र म्हणते, 'माझा आदेश चालेल' आणि एवढ्यासाठीच भावाने भावाचा गळा कापला, पुत्राने पित्याशी बंड केले. याच्याचद्वारे राष्ट्रीय अहंकार निर्माण केला जातो. याच्याच आधारे राष्ट्रीय प्रतिष्ठा उंचावते आणि अवनत होते. याचेच नाव एखादा ध्वज उंच करणे किंवा अधोमुख करणे होय.

''यह फितने जिनसे एक दुनिया है नाला
करिश्मा है फकत 'किसकी चले' का''

(जिगर मुरादाबादी यांची क्षमा मागत)

हा याच अहंकारी भावनेचा चमत्कार आहे की ज्याने ईश मार्गदर्शनाला क्षत-विक्षत केले. ही याचीच फलनिष्पत्ती आहे की नवनवीन श्रद्धातत्त्वांनी जन्म

घेतला. नवनवे धर्म उदयास आले. कोणी सूर्याशी नाते जोडले आणि 'रअ' देवतेचा प्रतिनिधी बनून फिरऔन म्हणविला गेला. कोणी ग्रह नक्षत्रांचा नातेवाईक बनून नमरूद ठरला, कोणी 'सूर्यवंशी' तर कोणी 'चंद्रवंशी' उपाधी धारण केली. याच प्रवृत्तीने चर्च-व्यवस्थेला जन्म दिला, जिने माणसांशी असे भयंकर वर्तन केले की जे वाचून आजही अंगावर काटे उभे राहतात.

बांधवांनो! ही झाली ''माझीच सत्ता चालेल''च्या अवीट स्वादाची अवस्था. परंतु मी आताच म्हटल्याप्रमाणे हे मान्य करणे क्रमप्राप्त ठरते की, ही मानवाची आपली स्वत:ची सामुदायिक गरज आहे. त्याच्यावर कोणा ना कोणाची सत्ता चालावी या लालसेपोटी माणसांना मार्गभ्रष्ट केले. आणि अत्याचाराच्या चक्कीत माणसांना दळून भरडून काढले. परंतु कोणत्या ना कोणत्या नावाने, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात कोणाचा तरी सत्ताधिकार निश्चित चालला आहे.

भटक्या-विमुक्त जातींच्या काळात कबिल्याच्या सरदाराची सत्ता चालत होती. मग जागीरदारांची चालू लागली. नंतर प्रतिष्ठित लोकांची चालली, पुढे पौपची चालली. त्यानंतर बादशहांची चालली. चर्च आणि साम्राज्यशाहीच्या युतीची चालली. पुढे ब्राह्मण पंडितांची चालली, पीरांची चालली, हुकूमशहांची चालली, मजूर डिक्टेटर शिपची चालली आणि आता या जगात, ज्याला स्वतंत्र जग म्हटले जाते लोकांची सत्ता (लोकशाही) चालत आहे. ही गोष्ट वेगळी की हे बिचारे लोक एक दिवसाचे राजे-महाराजे बनल्यानंतर स्वत: आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे गुलाम बनतात. परंतु वर वर पाहता ही गोष्ट मान्यताप्राप्त आहे की लोकच देशाचे राज्यकर्ते आहेत. त्यांच्यावर त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाचीही मर्जी चालायला नको. ना कबिल्याच्या सरदाराची, ना जागीरदाराची, ना प्रतिष्ठितांची, ना पोपची, ना बादशहाची, ना एखाद्या धर्म पंडिताची आणि ना कोणा ईश्वराची, लोकसंख्याधिक्याची, की ती जो फैसला करील तो दगडावरची रेघ होय. आणि लोक राज्यसत्तेचे स्वामी होत. हिलाच लोकशाही म्हणतात, जिची व्याख्या अशी -उदनेहसहू दू़प जदज्त ब़ूप जदज्त दे़ूप जदज्त. अर्थात लोकांची, लोकांनी, लोकांसाठी चालविलेली राज्यसत्ता आहे. लोकतंत्रीय राज्यसत्तेचा दृष्टिकोन, ज्यावर आजच्या काळातील लोकतांत्रिक शासनप्रणाली

कायम आहे. यात ईश्वरीय मार्गदर्शनाचा कसलाही हस्तक्षेप नाही आणि ना एखाद्या प्रेषित मार्गदर्शनास मान्य करणारी आहे. या प्रणालीने आपल्या विचारकार्याची कक्षा केवळ ऐहिक व्यवहारापर्यंतच मर्यादित राखली आहे. म्हणूनच याला सेक्युलर लोकशाही म्हटल जाते. मग याला चालविणारे आपल्या व्यक्तिगत जीवनात धार्मिक प्रवृत्तीचे असोत. परंतु ज्या अर्थी एक शासनप्रणाली या नात्याने हिची कोणतीही धार्मिक श्रद्धा नाही की एखाद्या धर्माला हिचा विरोधही नाही. या अटीवर की त्या धर्माने हिचे पालकत्व मान्य करावे.

ती धर्म आणि श्रद्धेला ऐहिक व्यवहारांपासून वेगळे व बेदखल केल्यानंतर त्याच्याशी कसलाही वाद घालत नाही. एखादा मनुष्य ईश्वराला मानतो किंवा नाही आणि तो जर मानतो तर कशा रीतीने व कोणत्या पद्धतीने भक्ती-आराधना करतो. या प्रणालीच्या दृष्टीने आस्तिक आणि नास्तिक, एकेश्वरवादी आणि अनेकेश्वरवादी, तत्त्वत: सर्व समान आहेत. यालाच धार्मिक स्वातंत्र्य म्हटले जाते आणि धार्मिक प्रवृत्तीचे लोक याबद्दल या प्रणालीचे आभार मानत राहतात.

या तात्त्विक बाबी इस्लामच्या दृष्टिकोनातून नव्हे, निर्बंध मानवी लाभांच्या दृष्टिकोनानेही चुकीच्या असल्या तरी दृष्टिकोनांच्या कार्य-विश्वातल्याच आहेत. यांचे कार्य यांच्या दृष्टिकोनाहून अगदी भिन्न आहे. इथेही 'माझा आदेश चालेल'चा अहंपूर्ण स्वाद आपले काम करीत आहे. ज्याप्रमाणे या स्वादाची रूपे प्रत्येक काळात आपल्या नागरी स्तरानुसार बदलत राहतील त्यानुसार आजच्या बौद्धिक आणि वैचारिक स्तरानुषंगे हिने प्रगत विकसित पद्धती अंगिकारल्या आहेत. याच गोष्टीला कवी डॉ. इकबाल यांनी सैतानाच्या तोंडून वदविली आहे.

हम ने खुद शाही को पहनाया है जमहूरी लिबास
जब जरा आदम हुवा है खुद शनास व खुदवानगर

आता हे डावपेच लोकांना कळू लागले आहेत. असे असले तरी शासन आणि शासक या दोघांची ही गरज अजून बाकी आहे. किंबहुना विचार-चिंतनाची व्यापकता आणि समस्यांची विपुलता लक्षात घेता अधिक सर्वंकष आणि अधिक परिपूर्ण राज्यसत्तेची आवश्यकता वाढत जात आहे. मानवाची बुद्धी व वैचारिकता इतकी प्रगत झाली आहे की तिने राज्यसत्तेची ओळख आत्मशासनाच्या दृष्टीने

प्राप्त करून घेतली आहे. तिने नीट समजून घेतले आहे की जेव्हा शासनसत्ता अशी बाब आहे, जिचा निर्णय दगडावरची रेघ होय, ज्याचे अपील कुठेही नाही. जिचा निर्णय कां कूं न करता मानावाच लागतो तेव्हा ही योग्यता आणि अखत्यारी ज्या कुणाची मानली जावी तो दोषविरहित, भूलचूक न करणारा असला पाहिजे. तो इच्छा-अभिलाषेपासून मुक्त आणि प्रेम व तिरस्काराच्या भावनांहून उच्चतम असला पाहिजे. त्याचे ज्ञान सर्वव्यापी, बुद्धिकौशल्य व दृष्टी सखोल असली पाहिजे किंवा अरबी भाषेत सांगायचे तर तो सुब्बुह आणि कुद्दुस असला पाहिजे. मानवबुद्धीला आता या गोष्टीचे आकलन होऊ लागले आहे की सत्ताधिकार आणि व्यंगदोषविरहितता परस्परपूरक आहेत. मानवबुद्धी हा फरकही जाणवू लागली आहे की राज्यसत्तेचा अमर्याद अधिकार कोणाला प्राप्त व्हावा आणि त्याचे ज्ञान अर्धवट, दोषयुक्त व त्याची सत्ता वर वर असावी. तो कोणाचा हिमायती आणि कोणाचा विरोधक नसावा. याच कारणास्तव राजकारणाचे विद्वान जेव्हा राज्यसत्तेची स्पष्ट कल्पना सोबत घेऊन हा सत्ताधिकार चालवणाऱ्याच्या शोधात निघाले तेव्हा त्यांना सृष्टीनिर्मितीत असा कोणी सुयोग्य आढळला नाही, ज्याला राज्य-सत्ताधिकाराचा पोशाख शोभून दिसावा.

परंतु ज्या अर्थी मानवी समुदायाला व राजकारणाला एका शासकाची नितांत गरज होती. त्याच्याखेरीज तो एक पाऊलही पुढे टाकू शकत नव्हता. म्हणून त्यांनी हा 'राज-मुकुट' ज्यालादेखील घातला, त्याच्या अंगी हे गुणविशेष आहेत असे गृहीत धरले.

''हा बादशहा मेला. बादशहा जिंदाबाद'', ''मुसोलिनी चूक करीत नाही.'' ''हिटलर चूक करीत नाही'' आणि सामान्य इच्छा अर्थात Common Will चूक करीत नाही वगैरे अशाच घोषणा किंवा श्रद्धा होत नसे. ''पोप चूक करीत नाही.'' तद्वतच आज ज्ञानाच्या उजेडातही मानव, राजकारण व सामुदायिकतेची गोडी गृहीतांवर चालत आहे. तद्वतच जशी अज्ञानाच्या अंधारयुगात चालत राहिली. याच कारणाने आज मानव-राजकारण व समुदायाचे जहाज नांगराविना डोलत आहे. आता तर त्या लोकांच्या तोंडूनही किंकाळ्या निघत आहेत, जे या सर्व गोरख धंद्याचे शोधकर्ता किंवा याचे तज्ज्ञ आहेत.

ही गुंतागुंत इस्लाम अतिशय सहजगत्या सोडवितो. तो म्हणतो की, ''जो ईश्वर तुमचा उपास्य आणि भक्ती-आराधनेस पात्र आहे तोच तुमचा खऱ्या अर्थाने शासक आणि तुमच्या आज्ञापालनासाठीही पात्र आहे.'' तुमचे आपल्या उपासनेत व आज्ञापालनात फरक करणे की तुम्ही एकाची भक्ती-आराधना करावी आणि दुसऱ्याचे बिनशर्त आज्ञापालन कर्मनिष्ठ सहभागित्व होय. असे करणे म्हणजे स्वत: आपल्या स्वभावाशी लढणे होय. संपूर्ण सृष्टीच्या प्रवृत्ती आणि संकल्पाच्या विरुद्ध आहे. आमच्या उपास्याशी बंड करण्यासमान आहे.

असे कराल तर ईश्वराचे काहीच बिघडणार नाही. उलट तुम्ही स्वत:चे फार मोठे नुकसान करून घ्याल. स्वत:चा सर्वनाश ओढवून घ्याल. असे करणे म्हणजे पर्वताशी किंवा विशालकाय दगडाशी टक्कर घेणे. इस्लामचा ईश्वर म्हणतो, तुम्हाला एका शासकाची आवश्यकता आहे तर सर्व सत्ताधिकारी दुसरा कोणी नव्हे तर केवळ मी आहे. तुम्हाला व्यंगदोषविरहित शासनकर्ता पाहिजे तर सकल सृष्टीत त्याचा शोध घ्या, कोठेही तुम्हाला असे अस्तित्व लाभणार नाही, जे परिपूर्ण आणि सर्वसत्ताधारी असेल. जमिनीपासून आकाशापर्यंत सर्वच्या सर्व माझे दास बनून माझ्या आज्ञापालनात मग्न आहेत. वाळवंटाच्या कणा-कणाला विचारा, राना-वनातल्या पाना-पानांवरचा मजकूर वाचा, सूर्य-चंद्र, ग्रह-नक्षत्रे काय म्हणतात ते ऐका. सर्वच्या सर्व माझी पवित्रता, व्यंगविरहितता वर्णन करीत आहेत. मी पसरविलेल्या जमिनीच्या अंथरुणास पाहा, मी उभारलेल्या आकाशाचे छत्र पाहा. कोठेही तुम्हाला दोष, उणीव किंवा उपद्रव दिसून येणार नाही. मीच तुम्हाला निर्माण केले आहे. मग तुम्ही कोणाचे म्हणणे मानायला चाललात? मी तुमचे पालनपोषण करीत आहे, मग असा तो कोण आहे, की ज्याच्यापुढे तुमचे शिर उपासनेसाठी व आज्ञापालनासाठी झुकावे? परतून तुम्हाला माझ्याचकडे यायचे आहे. विचार करा तो कोण आहे, ज्याची भक्ती-उपासना व आज्ञापालन तुम्हाला माझ्यासमोर सफल आणि प्रतिष्ठित ठरवू शकेल? असा कोण आहे, ज्याचा जोर माझ्यापुढे चालू शकेल? ज्याची प्रसन्नता व ज्याची शिफारस तुम्हाला माझ्या प्रकोपापासून वाचवू शकेल?

यास्तव माझ्या दया-कृपेचे सच्चे व पक्के अभिलाषी बनून आपल्या दीन-

धर्माला माझ्याकरिता विशुद्ध करून घ्या. पूर्णपणे एकाग्र होऊन आणि सगळीकडून तोंड फिरवून माझ्या आज्ञापालनात मग्न व्हा. माझीच उपासना करा आणि बिनशर्तपणे माझाच आदेश माना. मी तुम्हाला आपला प्रतिनिधी बनवून एवढा मोठा सन्मान प्रदान केला आहे याबद्दल कृतज्ञशील राहा. आणि माझ्या मर्जीचे प्रतिनिधी बनून माझी मर्जी स्वत:वरही लागू करा आणि या जगातील लोकांवरही लागू करा.

प्रिय बंधूंनो! हे आहे ते जीवनदायी जीवनामृत, जे इस्लाम मानवजातीस प्रदान करतो. याद्वारे मानवजातीच्या उद्यानात बहर येऊ शकतो. याद्वारे मानवजातीच्या डगमगणाऱ्या जहाजाला लंगर लाभून स्थैर्य प्राप्त होऊ शकते. ही अशी हृदयस्पर्शी गोष्ट आहे की तो मुस्लिमेतर बांधवही, जो पक्षपाताला बळी पडला नसेल, तोदेखील अंत:प्रेरणेने उद्‌गारेल की, या जगात सर्वाधिक सत्य गोष्ट हीच आहे. त्यांना नीट समजून येईल की अल्लाहच्या शिवाय दुसऱ्या कोणाला शासक वा सत्ताधारी मानणे हीच मुळात घोडचूक आहे. अशाने निरुपयोगी झाड-झुडपे फोफावत जाऊन त्यात माणूस गुरफटत जात राहिला आणि आज गुरफटलेला आहे. जर यांना मुळासकट उपटून काढले नाही तर काहीच साध्य होणार नाही.

जरा नीट विचार करा, तो मानव जो पाण्यात माशापेक्षा अधिक चांगले पोहतो, तो मानव जो अवकाशात पक्ष्यांपेक्षा अधिक वेगाने उडतो, तो मानव जो चंद्रावर ध्वजारोहण करून आला आणि मंगळापर्यंत जाऊ इच्छितो. अशा बुद्धिकौशल्ययुक्त मानवावर त्याचा (ईश्वराचा) आदेश चालला पाहिजे, जो मानवाहून अगणित पटींनी ज्ञानी व बुद्धिकौशल्य राखणारा आहे. ज्याचे ज्ञान असीम व अमर्याद आहे व ज्याचे बुद्धिकौशल्य अथांग आहे अशा सामर्थ्यशाली माणसावर ईश्वराचा आदेश चालला पाहिजे, जो सर्व शक्तिसामर्थ्यांचा स्वामीच नव्हे तर निर्माणकर्ता आहे, जो मानवाच्या स्वभावाला त्याच्याहून अधिक जाणतो. तो आजचे जेवढे ज्ञान बाळगतो तेवढेच उद्याचेही बाळगतो. माणसाला तर याची ही खबर नाही की पुढच्या क्षणी काय घडणार आहे? अशा मानवावर ज्याचा स्वभाव न्यायप्रिय आहे आणि अत्याचार व पक्षपाताचा तिरस्कार करतो त्या ईश्वराचा आदेश चालणे न्यायाची निकड आहे. ईश्वर ना एखाद्या वंशाशी संबंध

राखतो, ना एखाद्या राष्ट्राशी! तो सर्वांचा दयाळू-कृपाळ–पालनकर्ता आहे की त्या बिचाऱ्यांचा जे उच्च-नीचतेच्या जात्यात विवशतेने वर्ण-वर्गाच्या ओढाताणीत भरडले जात आहेत, ते वांशिक अभिमान आणि राष्ट्रीय पक्षपाताने पछाडलेले आहेत. आता तुम्हीच सांगा, तुमची मर्जी माझ्यावर की माझी मर्जी तुमच्यावर शेवटी का म्हणून चालावी? तुम्ही माझ्यावर की मी तुमच्यावर कोणत्या अर्थाने श्रेष्ठतम आहे?

प्रत्येक सुज्ञ व शुद्धीत असलेला मनुष्य सांगेल की माझ्यावर आणि सर्वांवर त्याची मर्जी आणि त्याचा आदेश चालला पाहिजे. ज्याची स्वत:ची अशी कसलीच गरज नाही. जो सर्व विद्वानांहून अत्याधिक ज्ञानी आहे. जो समस्त बुद्धिमानापेक्षा अधिक बुद्धिमान आहे. जो सगळ्या नि:स्वार्थ लोकांपेक्षा खूप अधिक नि:स्वार्थ आणि नि:स्पृह आहे. त्याच ईश्वराचा आदेश आमच्यावर चालला पाहिजे.

हेच इस्लाम सांगतो आणि हीच सर्वांच्या आकलनात येणारी गोष्ट आहे की मानवावर हुकूम चालविणारा असा आदेश, ज्याचे कोठेही अपील केले जाऊ शकत नाही, असा आदेश की ज्याबाबत कां कूं करण्यास वाव नाही, असा आदेश की, ज्याविषयी उचित-अनुचित, योग्य-अयोग्य असण्याचा प्रश्नच नाही. असा बिनशर्त आदेश फक्त ईश्वराचा असला पाहिजे. कारण तोच पवित्र आणि व्यंगदोषविरहित आहे. तोच सर्व सत्ताधिकारी व सर्वज्ञ आहे. तोच नि:स्वार्थ आणि नि:स्पृह आहे. तोच रचयिता आहे, तोच पालनहार आहे. त्याला आपली राज्यसत्ता पूर्ण करण्यात आनंद नाही. त्याला याची गरज नाही की आमच्या अस्तित्वाच्या या अल्पशा भागावरही, ज्यात आम्हाला अधिकार व स्वातंत्र्य दिले गेले आहे, त्याचाच सत्ताधिकार चालावा. ईश्वराचा सत्ताधिकार तर समस्त सृष्टीवर आणि स्वत: आमच्या अस्तित्वाच्या मोठ्या हिश्श्यावर चालत आहे. ही आमची स्वत:चीच गरज आहे. स्वत: आमच्या लाभांची, आमच्या गरजांची निकड आहे की आम्ही आपल्याहून श्रेष्ठ, सर्व सृष्टीनिर्मितीहून श्रेष्ठ साऱ्या विश्वाच्या रचयित्यापुढे नतमस्तक व्हावे. निवड आणि अधिकाराच्या संक्षिप्त स्वातंत्र्यावर जे आम्हाला प्रदान केले गेले आहे, विसरू नये. यालाच सर्व काही समजू नये.

आपल्या या खुद अखत्यारीच्या हक्काचा मनापासून त्याग करून स्वयंप्रेरणेने त्या सर्वोच्च सर्वशक्तिमान ईश्वराला सर्व सत्ताधिकारी (Sovereign) मानावे आणि आचरणपूर्वक त्याच्या अमर्याद राज्यसत्तेपुढे शरणागत व्हावे.

हाच सर्व विश्वाच्या पालनकर्त्या ईश्वराचा संदेश आहे आणि याच अर्थाने याला सादर करणारे प्रेषित (स), सर्व विश्वाकरिता कृपानिधी होत. जर मानवाने हा संदेश कबूल केला नाही तर त्याची जीवननौका अशीच डगमगत राहील. आपत्ती आणि अपघातांच्या भीषण लाटांचे आघात सहन करीत राहील. स्वत: आपल्या पायांनी चालत जाऊन विनाशाच्या गर्तेत कडेलोट होईल.

आम्ही आपल्या जीवनाची दोन भागात विभागणी करून ठेवली आहे. आमचे धार्मिक जीवन वेगळे आणि ऐहिक जीवन वेगळे आहे. आमचे उपास्य एक आहे तर आमचा शासन सत्ताधिकारी दुसरा. हे चुकीचे आहे. जीवनाच्या या विभागणीस या दुटप्पी धोरणाला इस्लाम सहन करीत नाही.

इस्लाम म्हणतो, ''एकरंगी व्हा. अल्लाहच्या रंगात पूर्णपणे रंगून जा. आपल्या ऐहिक जीवनात आपल्या धर्माचा प्राण ओता, ज्याची तुम्ही उपासना करता, त्याचेच आज्ञापालन करा. असे आज्ञापालन की, ज्यावर संपूर्ण जीवन व्यवस्था उभारलेली असेल. अर्थात व्यक्तिगतरीत्याही आणि सामुदायिकरीत्याही. त्याच्या सर्वव्यापी राज्यसत्ताधिकारापुढे आपला माथा टेका. आपल्या दास्यत्व भावनेचे समाधानही त्याच्याच उपासनेद्वारे करा आणि आपल्या सामुदायिकतेच्या गरजेची पूर्तता त्याच्याच सत्ताधिकाराने करा. जे तुमच्या उपासनेचे मध्यवर्ती स्थान आहे, तेच तुमच्या आज्ञापालनाचे केंद्र असावे.''

जर आम्ही अशाच प्रकारे आपल्या जीवनाला दोन भागात विभागून ठेवले तर हे दोन्ही भाग कमजोर राहतील. ना आमच्या कर्मनिष्ठा जीवनापासून तुटलेल्या उपासनेत प्राण राहील, ना आमचे सांसारिक जीवन धर्म आणि उपासनेच्या दिव्य तेजाने उज्ज्वल होऊ शकेल. ''ऐहिकता जर शरीर आहे तर धर्म त्याचा प्राण आहे.'' आत्मा शरीरापासून वेगळा करा तर आत्मा निघून जाईल आणि अचेतन शरीर पडून राहील. शरीरात कसलेही त्राण चैतन्य उरणार नाही.

जगात नेहमी ऐहिकताही राहिली आहे आणि कोणत्या ना कोणत्या स्वरूपात धार्मिकताही. पवित्र कुरआनाद्वारे माहीत होते की, प्रेषितांचे मिशन जिथे हे राहिले की धार्मिकतेला उचित दिशा प्रदान करावी. तिथे हेही राहिले की धर्म आणि ऐहिक जीवन दोघांची सांगड घालावी. एकाला दुसऱ्यात समाविष्ट करावे. अंतिम प्रेषित आदरणीय मुहम्मद (स) यांनी आणि त्यांच्यानंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी धर्माला ऐहिक जीवनात गुंफण्याचा जो नमुना सादर केला आहे की ज्याने जन्मजात आंधळ्यांखेरीज सर्वांचेच डोळे उघडले. परिणामी भूतलावर असा नयनरम्य 'बहर-काळ' येऊन गेला की आजही जगाला त्याच्या आठवणीने अत्यानंद वाटू लागतो. अर्थात हा बहर अल्लाहची सर्वव्यापी राज्यसत्ता (Sovereignity) अमलात आणण्याविना येऊ शकत नव्हता.

विचार करण्यासारखी बाब आहे की धार्मिकता, भक्ती-उपासना व सदाचारानेच पूर्ण होते. तर मानले पाहिजे की सध्या साऱ्या जगात इस्लामी व्यवस्था कायम आहे. कोणत्याही देशात जा, तुम्हाला नमाज पढण्यापासून रोखले जाणार नाही. कोणत्याही देशात जर तुम्ही सत्य बोलाल तर तुमची जीभ छाटली जाणार नाही. जर धर्म आणि त्याची स्थापना फक्त उपासना व सदाचरणाचे नाव आहे तर काळजी कसली? सर्वत्र ती कायम आहे. केवळ कायमच नव्हे तर एखाद्या मुस्लिमेतर देशातही जर तुम्ही आपल्या उपासनेचा इतमाम राखाल. सत्य आणि न्यायाला धरून राहाल तर तुम्हाला हृदयात स्थान लाभेल. अरब देशाच्या अनेकेश्वरवाद्यांमध्ये उपास्यसंदर्भात सत्ताधिकाराची कल्पना सामील होती आणि या कल्पनेवर त्यांची जीवनव्यवस्था चालत होती.

जरा विचार करा, काय अरब देशीय अनेकेश्वरवाद्यांचा स्वभाव विकृत झाला होता की ज्यामुळे ते निरुपद्रवी उपासनेने आणि कोमल मधुर चारित्र्याने चिडत असत. जर "अल्लाहू अकबर"मध्ये अल्लाहची सर्वश्रेष्ठता आणि त्याच्या राज्यसत्ताधिकाराचे ऐलान नव्हते आणि हे केवळ प्रशंसा म्हणून अल्लाह मोठा महान असण्याचे वर्णन होते तर ते बेचैन होऊन आपले भान का विसरत आणि हे ऐलान करणाऱ्यांविरुद्ध सर्व डावपेच वापरण्यास का प्रवृत्त झाले? शेवटी अल्लाहच्या स्तुतिप्रशंसेने यांचे काय बिघडत होते? तेदेखील अल्लाहला

जमीन-आकाशाचा रचयिता मानणारे होते, मग तरीही का म्हणून त्याच ईश्वराची प्रशंसा ऐकू शकत नव्हते?

बंधूंनो! मर्म शेवटी तेच. अल्लाहच्या श्रेष्ठतेचे त्याच्या सार्वभौमिक सत्ताधिकारांच्या घोषणेत कर्माचा प्राण जेव्हा ओतला जाईल, तेव्हा ती सर्व तत्त्वे नाहीशी होतील, ज्यांची श्रेष्ठता आणि राज्यसत्ता चालत असेल. आज 'अल्लाहु अकबर' आणि 'ला इलाह इल्लल्लाहू' तो प्रभाव दाखवीत नाही जे त्यांचे वैशिष्ट्य आहे आणि त्यांचा प्रभाव यापूर्वी या वचनांनी दाखवलेला आहे. याचे एक कारण असे आहे की, यांची सर्व यथार्थता लोप पावली आहे. ना यांचा उद्घोष करणारा यांच्या अर्थपूर्णतेसह यांचा उद्घोष करतो आणि ना ऐकणारा यांची यथार्थता लक्षात घेतो. जास्तीत जास्त याला एका जनसमूहाचा नारा (घोषणा) समजले जाते.

आता तर स्वत: मुस्लिमदेखील ''अल्लाहू अकबर''ला नारा (घोषणा) म्हणतात आणि नारेबाजीसाठी याचा वापर करतात. दुसरे कारण असे की, हे जर अल्लाहखेरीजच्या राज्यसत्तेविरुद्ध मुक्तीची घोषणा आहे तर हे स्वत: आपल्याविरुद्ध बंड पुकारणे ठरेल. कारण आजच्या लोकतांत्रिक युगात आचरणदृष्ट्या जे काही होत असेल, परंतु वरवर पाहता प्रजाच सत्तारूढ असल्याचे आढळते. जर कोणाला याबद्दल शंका असेल तर त्याने ही गोष्ट जी या वचनांमध्ये सांगितली गेली आहे ती अमलात आणण्याच्या दृढ संकल्पासह दुसऱ्या शब्दात बोलून दाखवावी. तेव्हा कळून येईल की ज्ञानाच्या अलंकारांनी सुशोभित आजचे जग किती सुसभ्य व किती विशाल हृदयाचे आहे.

अल्लाहची उपासना आणि त्याचे बिनशर्त आज्ञापालन या दोन्ही बाबी यापूर्वीही विभक्त होऊन एकमेकांना भेटण्यासाठी बेचैन राहिल्या आहेत. हाच प्रकार आजदेखील चालला आहे आणि म्हणूनच ना उपासनेत जीवन राहिले आहे, ना जीवनात कसले चैतन्य. हे अल्लाहचे फर्मान आहे हे रसूल (प्रेषितांचे) आवाहन आहे की या दोघांची सांगड घालावी आणि हेच ते स्थान होय, जिथून श्रद्धावंतांच्या श्रद्धेची कसोटी सुरू होते. उघड आहे की, ज्या लोकांचे आज्ञापालन होत असेल आणि कोणी त्यांच्या आज्ञापालनाच्या कक्षेतून स्वत:ला खेचेल तर ते त्वेषाने त्याच्या पाठीशी लागतील.

धोका, फसवणूक, खोटे आरोप, सामाजिक बायकॉट, आर्थिक कोंडी, बेडी, हातकडी, तोफ, तलवार. तात्पर्य हे की, अत्याचाराचे जे साधन ज्याच्याजवळ असेल ते घेऊन तो धाव घेईल. त्यावेळी हे दिसून येईल की, 'आमन्त बिल्लाही'चा (मी अल्लाहवर इमान राखतो) उद्‌घोष श्रद्धावंतांने दृढ निश्चयाने त्यावर अटळ राहण्याच्या संकल्पासह केला आहे की जिभेचा फेस उडविला आहे. अल्लाह आमचे रक्षण करो, ईश्वरावर एखादा उपकार केला आहे की आमच्या अंत:करणात अल्लाहच्या आज्ञापालनासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भावना आणि त्याच्याशी निष्ठा राखण्यात प्राणार्पण करण्याचा इरादाही आहे?

प्रिय बांधवांनो! ही कसोटीसुद्धा ईश्वराने प्रदान केलेली फार मोठी देणगी आहे. ही नसेल तर शेवटी श्रद्धावंत आपल्या श्रद्धेची कोणत्या गोष्टीने पारख करतील. ते कसे जाणतील की त्यांची श्रद्धा निद्रिस्त आहे, निष्प्राण आहे की जागृत आणि जिवंत आहे. याच द्विधावस्थेत श्रद्धा सजीव होते. श्रद्धा-विश्वास अधिक शक्तिशाली होतो. ईश-प्रेमाला खाद्य मिळते. स्थिरतेच्या इराद्याला सामर्थ्य लाभते. निष्ठाभावनेत एक अवीट गोडी निर्माण होते. आज्ञापालनात एक वेगळी लज्जत येऊ लागते.

हीच कलिमा (मूळवचना)ची हकीकत आहे. पवित्र कुरआनच्या अनुषंगाने धार्मिक प्रगती केवळ आंतरिक स्थितीच्या प्रगतीचे नाव नाही; किंबहुना कसोटींच्या परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे, विश्वासात दृढता आणि श्रद्धेची प्रगती आहे. ईश्वर आपल्या एखाद्या दासाला ही सद्‌बुद्धी प्रदान करो की तो गंभीर संकल्पासह आपल्या अस्तित्वास अन्य इतरांच्या आज्ञापालनातून मुक्त करून सर्व सत्ताधिकारी अल्लाहच्या हवाली करावे. परिणामस्वरूपी विविध प्रकारच्या सत्त्वपरीक्षा याचे स्वागत करतील. सर्व दरवाजे बंद होतील. एक अल्लाहखेरीज सर्व आधार तुटतील. जगातील कोणतीही शक्ती त्याला वाचवू शकणारी नसेल.

अशा असहाय, अगतिक अवस्थेत जेव्हा तो आपल्या सच्चा पालनकर्त्या ईश्वरापुढे हात पसरवून म्हणेल, ''हे आमच्या पालनकर्त्या! प्रभू आम्हावर सहनशीलतेचा वर्षाव कर आणि आमचे पाय स्थिर कर व द्रोही लोकांवर आम्हाला

विजय दे.'' तेव्हा खात्रीने फरिश्त्यांच्या रांगांमध्ये खळबळ माजेल. कुरआनच्या शिकवणीनुसार याच कैफियतीचे नाव रुहानियत (आध्यात्मिकता) आहे. हीच द्विधावस्था कुरआनला अपेक्षित आहे. यापासून अलिप्त राहून एखादे अंतर्ज्ञान. एखादा चमत्कार आणि एखादे अध्यात्म अपेक्षित असण्याचा कोणताही संकेत कुरआन आणि प्रेषित आचरणात आढळत नाही. कुरआनने दूषित श्रद्धेचा निर्देश दूषित आचरणानेच केला आहे. दूषित आध्यात्मिकतेचा उल्लेख कोठेही नाही.'

बंधूंनो! तुमच्या-आमच्यासारखे मामुली आकलन राखणारे लोकही जेव्हा एखाद्याला आपला मित्र बनवितात, कोणाला नोकरीवर ठेवतात किंवा अन्य एखादा मामला करतात तेव्हा आधी त्याची पारख करतात. त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावर आणि त्याच्या वक्तृत्व शैलीवर भाळून जात नाही. तेव्हा त्या ईश्वराविषयी काय विचार आहे, जो ज्ञान व बुद्धिकौशल्याचा निर्माणकर्ता आहे. काय तो आमच्या तोंडी जमाखर्चावर संतुष्ट होईल आणि आपली देणग्यांनी भरलेली जन्नत (स्वर्ग) आमच्या हवाली करील? तो काय हे विचारणार नाही की, ''तुम्ही जीवनाच्या संघर्षापासून दूर राहून, प्रतिकाराच्या मैदानाला पाठ फिरवून द्विधावस्थेपासून आपला बचाव करून, आपल्या अस्तित्वाला चेतनाहीन राखून कोणत्या एकांतवासात बसून माझ्या नावाचा जप करीत आपल्या हृदयाला बोलते करीत राहिलात? सांगा, मी हा आदेश केव्हा आणि कोठे दिला होता?''

काय, तो हे विचारणार नाही का। ''माझा कलिमा (मूळवचन) ज्यात आशयाचे एक विश्व भरले होते, तुम्ही त्याचा अर्थ लक्षात न घेता पढत राहिलात आणि त्याच्या शब्दांना आपल्यासाठी विविधरीत्या वापरत राहिलात? सांगा तुम्ही असे का केले?'' हा कलिमा एखाद्या जंतरमंतरसारखी गोष्ट नव्हे की याच्या पठणाने एखादा जादूचा पुतळा येऊन आमचे काम बनवील. तो आमच्याकडून गंभीर दृढ संकल्पाची अपेक्षा करतो तो आमच्या संपूर्ण अस्तित्वास आपल्या छत्रछायेत आणू इच्छितो. तो आमच्याकडून ही अपेक्षा करतो की आम्ही आपल्या दीन (धर्मा)ला आणि ऐहिकतेलाही कलिमाच्या कक्षेत आणावे. जर तुम्ही असे केले आणि आपल्या दाव्यात सच्चे ठरले आणि त्यावर अढळतेने कायम राहिले तर बघा, कशा प्रकारे अल्लाहच्या कृपेचा तुमच्यावर वर्षाव होतो. कशा प्रकारे

त्याची मदत तुमच्यावर अवतरते. केवढा सन्मान, केवढी प्रतिष्ठा, केवढे शक्तिसामर्थ्य आणि कसे स्वच्छ शुद्ध जीवन तुम्हाला लाभते!

आज तुम्ही न्यायासाठी भीक मागता आणि ती तुम्हाला मिळत नाही. मग तुमच्याकडून न्यायाची अपेक्षा कशी केली जाईल? आज तुमची मान-प्रतिष्ठा सुरक्षित नाही. नंतर तुम्ही मान-प्रतिष्ठेचे, शील अब्रूचे राखणदार कसे बनाल? आज तुम्ही सुख-समृद्धीच्या मागे धाव घेतात आणि ती तुम्हाला लाभत नाही, पण पुढे तिला ठोकर माराल आणि ती तुमच्या पायाशी लोळण घेईल. आज तुम्ही धड अनुयायीसुद्धा नाहीत मग पुढे तुमच्या नेतृत्वास मान्य केले जाईल? आज तुम्ही मान-प्रतिष्ठेसाठी हळहळता, मग पुढे मात्र लोक तुमचे सान्निध्य प्राप्त करून प्रतिष्ठित होतील? आज तुम्ही आपत्तींच्या परिमाणांमध्ये अशासाठी व्यस्त आहात की त्या संबंधाने लहानशा आपत्तीला अंगिकारावे, पण नंतर तुम्ही स्वत: असत्याकरिता आपत्ती आणि आपत्त्यांकरिता, दयाकृपा ठराल. आज ना तुमच्या व्यक्तिमत्त्वात वजन आहे, ना तुमच्या कथनात. जर तुम्ही एकेश्वरवादी वचन 'ला इलाह इल्लल्लाह'चे वजन आपल्या अंतरंगी, आपल्या व्यक्तिमत्त्वात भारावून घ्याल तर तुमच्या अंगी एवढा भारदस्तपणा निर्माण होईल की तुमच्या इशाऱ्यांनी तुमचे इरादे ओळखले जातील.

मला वाटते, मी आपल्या व आपल्या जनसमुदायाविषयी जे काही सांगितले आहे, त्यास आपल्यापैकी कोणी असे समजू नये की मी मनातला राग बाहेर काढला आहे. किंबहुना याला वस्तुस्थिती व्यक्त करणे मानतील. मग या गोष्टीशीही कोणा श्रद्धावंतास मतभेद नसेल की अल्लाहचा बोलबाला व्हावा. अल्लाहचा कलिमा तर उच्चतम होणारच. यास्तव जो जनसमूहदेखील याला छातीशी लावील, तोदेखील या पवित्र वचनासोबत प्रतिष्ठित होईल. त्याचीही मान उंचावेल. पवित्र कुरआनच्या कथनानुसार 'तुम्हीच उच्चतम ठराल, जर तुम्ही मोमीन (सच्चे श्रद्धावंत) असाल.'

परंतु कलिमालां छातीशी लावण्याचा अर्थ त्यातल्या शब्दांना कवटाळणे नव्हे, ना त्याचा कानामात्रा दुरुस्त करणे होय. याचा जास्तीत जास्त जप करणेही पुरेसे नाही. ना त्याचा अर्थ जाणून घेणे पर्याप्त आहे; किंबहुना त्याच्या पूर्ण

आशयासह आचरण करणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर कुरआनला आपला मार्गदर्शक बनवून जीवनपथावर पुढे जाणे आहे.

परंतु माझ्या बांधवांनो! असेही नाही की सत्याच्या मार्गात फक्त अडचणी आणि आपत्ती आहेत. नि:संशय या अडचणी आमच्या श्रद्धाशीलतेची कसोटी आहे आणि जर ईश्वरकृपेने आम्ही या सत्त्वपरीक्षेत चांगले गुण प्राप्त करून घेतले तर या अडचणी ईश्वराच्या फार मोठ्या देणग्या ठरतील. त्याचबरोबर उत्साह वाढविणारी गोष्ट हीदेखील आहे की मुस्लिम जगत आणि मुस्लिमेतर जगत, आता आपल्या पायांनी चालत येऊन इस्लामच्या जवळ येत आहेत; किंबहुना येऊन पोहोचले आहेत. मुस्लिम राष्ट्रात पाश्चात्त्य संस्कृतीच्या आक्रमणाने मुस्लिमांना जागृत केले आहे. ते जागृत होऊन नास्तिकता व भौतिकवादाच्या विरोधात पंक्तिबद्ध होत आहेत. आणि हे उघड आहे की जेव्हा एकेश्वरवाद आणि नास्तिकता यांचा सामना समोरासमोर होईल, तेव्हा अल्लाहची मदत एकेश्वरवादाचा ध्वज उंचावणाऱ्यांच्या पाठीशी असेल आणि ज्याला अल्लाहचे साहाय्य लाभेल त्याला कोण पराजित करू शकेल?

दुसरीकडे पाश्चात्त्य संस्कृती की जी वैचारिक नेतृत्वहीन अजूनही आहे, तिची ही दशा आहे की तिने व्यक्तीला वेसण न घातलेला सांड बनवून टाकले आहे. कुटुंबव्यवस्थेला क्षत-विक्षत करून टाकले आहे. ते नातेसंबंध, ज्यांना माणसाने नेहमी आदरणीय आणि पवित्र मानले आहे त्यांना या संस्कृतीने निरर्थक बनविले आहे. वृद्ध माता-पिता याच जगात स्वत: आपल्या मुलांच्या हातून ईशप्रकोपाची गोडी चाखत आहेत. या आणि अशा प्रकारच्या भौतिकवादाच्या उत्पत्तीने स्वत: या संस्कृतीच्या शोधकर्त्यांना व तज्ज्ञांना आपल्या हरकतींनी बेजार केले आहे. कधी कधी यांच्या तोंडून हिच्याविरुद्ध अशा भयानक किंकाळ्या निघतात, ज्यांचा भीषण स्वर इथपर्यंत ऐकू येतो.

आता ते समजू लागलेत की आम्ही भौतिकवाद आणि ऐहिकतेच्या ज्या ठिकाणाहून निघालो होतो त्या प्रवासाने आम्हाला निमर्नुष्य वाळवंटापर्यंत पोहोचविले आहे आणि पुढे प्रकोपाची अशी खोल दरी दिसत आहे की जिच्यापासून बचाव

करण्याचा कोणताही मार्ग लक्षात येत नाही. आपल्या संस्कृतीच्या चालत्याफिरत्या नमुन्यांनी त्यांच्यात एका अशा गोष्टीची अभिलाषा निर्माण केली आहे की जिच्याद्वारे त्यांची दास्यत्वाची तहानही भागावी आणि भौतिक गरजाही पूर्ण व्हाव्यात. आणि ज्या अर्थी आजदेखील जगाचे वैचारिक नेतृत्व याच लोकांकडे आहे म्हणून त्यांच्या या जाणिवांनी साऱ्या जगाचे प्रभावित होणे स्वाभाविक आहे.

अशा प्रकारे हे लोक सुज्ञता व इराद्याविना सत्य-आवाहनाचे दरवाजे उघडत आहेत. पश्चिमेच्या नास्तिकवादी संस्कृतीची ही परिणती पाहून पूर्वेकडच्या जनसमूहांची, विशेषत: मुस्लिम जनसमूहांचे डोळे उघडत आहेत आणि त्यांना आपला तो विसर पडलेला धडा आठवू लागला आहे. ज्याला पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्राबल्याने आणि तिच्या नकली रत्नमाणकांच्या चकाकीने विसर पाडला होता आणि आता मुस्लिम जगात

फिर ये गोगा है कि ला साकी शराबखान साज
दिल के हंगामे मये मग़रिब ने कर डाले खमोश

परंतु याचा अर्थ हाही नव्हे की, सारे जग वशीभूत होण्यासाठी तयार बसले आहे. असा भ्रम वास्तविक स्वत:ला धोका देणे ठरेल की इस्लामच्या गुणविशेषांवर प्रवचन देण्याचा अवकाश आहे, त्यानंतर युरोप, आशिया आणि अमेरिका व आफ्रिका देशातील लोक इस्लामच्या दिशेने धाव घेतील. हा काही अलाऊद्दीनचा दिवा नव्हे की संध्याकाळी मोकळे मैदान पडले होते आणि सकाळी भव्य महाल दिसू लागला. जेव्हा प्रेषितांनासुद्धा एकेश्वरवादी संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली, जे प्रत्येक क्रांतीचे मूळ आहे तेव्हा याबाबत त्यांच्या अनुयायींना अपवादात्मक कसे ठरविले जाऊ शकते? तथापि, हे निश्चित की हा काळ इतिहासाचे असे वळण आणि सत्य-आवाहनासाठी अशी मौल्यवान संधी आहे, जी कधी कधी येते. जेव्हा हृदयाची जमीन समतोल व सुपीक होऊन सत्य-आवाहनाचे बीज कबूल करण्यास तयार होते. विश्वरचियत्यातर्फे सत्यनिष्ठ लोकांनाही संधी अशी दिली गेली आहे की जर ते गफलतीत पडून राहिले आणि 'दाता' बनण्याऐवजी 'याचक'च बनून राहिले तर त्यांना याचा सक्त जाब विचारला

जाईल. या अर्थाने, या बहुमूल्य संधीने श्रद्धावंतांच्या कसोटीला अधिक सक्त आणि कटोर बनविले आहे.

सज्जन हो ! जमाते इस्लामी आपल्या समस्त इस्लामी बांधवांची हीच सेवा आपल्या आवाक्यानुसार पार पाडत आहे. ती त्यांना सांगते की, जागृत व्हा आणि डोळे उघडून पाहा, तुमचे भविष्य अंधकारमय होत चालले आहे. ती आपल्या बांधवांच्या दास्यत्वभावनेला जागृत करून त्यांच्या मनात हा दृढ विश्वास निर्माण करू इच्छिते की त्यांनी आपल्या धर्माला आपल्या सांसारिक जीवनात समाविष्ट करावे. आपले राजकीय स्वरूपाचे हक्क आपल्या मर्जी व अखत्यारीला बाजूला ठेवून आणि आपल्या खोट्या व काल्पनिक आणि वैचारिक शासनसत्तेच्या दाव्यांपासून तौबा (क्षमायाचना) करून आपल्या सर्वसत्ताधिकारी उपास्य अर्थात अल्लाहलाच राज्यसत्तेचा स्वामी मानावे.

आजच्या राजकीय व्यवस्थेने दिलेल्या हक्कांपासून पिच्छा सोडवून आपल्या खऱ्याखुऱ्या सर्वसत्ताधिकारी उपास्यासमोर शरणागत व्हावे. एवढेच नव्हे तर त्यांनी जगवाल्यांच्या दुरंगी धोरणापासून मुक्त करून त्यांना एकरंगी होण्यास प्रवृत्त करावे. त्यांच्या मनाला याबाबत समाधान लाभावे की केवळ हीच अशी कार्यशैली आहे, ज्यात त्यांची ऐहिक सफलताही लपलेली आहे आणि मरणोत्तर जीवनाच्या मुक्तीचा वशिलादेखील हाच मार्ग होय.

जमाते इस्लामी विशेषत्वाने आपल्या जनसमूहाच्या तरुणांना सांगते की, मुलांनो ! भानावर या. स्वतःला नीट ओळखा. आरशात आपली छबी न्याहाळण्याची कला सोडून द्या. खडे निवडण्याचे शिका. वास्तविक तुम्ही फार महान आहात. तुम्ही या धरतीचे आकाश आहात. तुम्ही या कमजोर जनसमूहाचे सामर्थ्य आहात. तुम्ही या उज्ज्वल जनसमूहाचे भवितव्य आहात. तुम्ही या अत्याचारपीडित जनसमूहाचे भाग्य आहात. आपल्या सळसळत्या रक्तात श्रद्धाशीलतेचे चैतन्य मिसळून टाका. उठा आणि आपल्या सर्वाधिक दयाशील कृपाळू ईश्वरासमोर नतमस्तक व्हा आणि असत्य उपास्यासमोर छाती फुलवून उभे राहा. मी प्रत्येक तरुणाला सांगतो, प्रिय मुला ! लक्षपूर्वक ऐक.

तू राजकुन फकां है अपनी आँखो पर अयां हो जा
खुदी का राजदां हो जा खुदा का तर्जुमां हो जा
हवस ने टुकडे टुकडे कर दिया है नौए इन्सां को
उखवत का बयां हो जा मुहब्बत की जबां हो जा

ही गोष्ट शेवटी कशा प्रकारे मनुष्यबुद्धी मान्य करून घेते की निर्मिती एकाची तर आदेश दुसऱ्याचा. निर्माण करणारा व पालनपोषण करणारा कोणी एक आहे आणि आदेश मात्र दुसऱ्या कोणाचा तरी चालावा. भूमी कोणाची आणि राज्यसत्ता दुसऱ्या कोणाची का?

ज्याने मानवाची रचना केली, ज्याने मानवाकरिता जमिनीला निवासस्थान बनविले, जो आपली हवा, पाणी, आपला प्रकाश व उष्णता आणि आपल्या निर्माण केलेल्या सर्व साधनसामग्रीने मानवाचे पालनपोषण करीत आहे. ज्याच्या शक्तिसामर्थ्याने मानव आणि तो वास्तव्य करीत असलेल्या जमिनीला घेरून ठेवले आहे आणि ज्याच्या सामर्थ्यकक्षेतून मनुष्य कोणत्याही परिस्थितीत बाहेर निघूच शकत नाही. बुद्धी आणि स्वभावाची निकड आहे की तोच मानवाचा आणि या सर्व भूमीचा स्वामी आहे. तोच ईश्वर आणि पालनकर्ता आहे. तोच बादशहा आणि शासकही आहे. त्याने निर्माण केलेल्या विश्वात त्याच्या स्वत:खेरीज दुसऱ्या कोणाला राज्यसत्ताधिकाराचा हक्क पोहोचतो का?

कशा प्रकारे एक दास किंवा गुलाम हे सांगण्याचा अधिकार राखतो की तो आपल्यासारख्या इतर दासांचा स्वामी आहे किंवा स्वत: आपला मालक आहे? निर्माणकर्त्या व पालनकर्त्या ईश्वराखेरीज आपल्या निर्मिती आणि आपल्या दासांचे स्वामित्व आणखी कोणासाठी योग्य ठरू शकते? कोण एवढे सामर्थ्य बाळगतो? कोणाजवळ एवढे ज्ञान आहे? कोण एवढा प्रतापशाली आहे की आपल्या या विशाल साम्राज्यात सत्ता चालवू शकेल?

जर मनुष्य या सार्वभौम राज्याच्या सर्वोच्च शासकाचा सत्ताधिकार मान्य करीत नाही आणि त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचा सत्ताधिकार मानतो किंवा स्वत:ला सत्ताधिकारी समजतो तर हे वस्तुस्थितीच्या अगदी विरुद्ध आहे. मुळातच

चुकीचे आहे. एक अतिभव्य असत्य आहे. सर्वाधिक स्पष्ट असत्य कथन. असे खोटे की, ज्याचे खंडन जमीन-आकाशाची प्रत्येक वस्तू करते.

अशा निराधार दाव्यांनी व अशा चुकीच्या मान्यता व आज्ञापालनांनी सत्य वस्तुस्थितीत तिळमात्र फरक पडत नाही. जो खऱ्या अर्थाने स्वामी आहे तो स्वामीच राहील. जो खरा बादशहा आणि शासक आहे, तो बादशहा आणि शासकच राहील. तथापि, स्वत: या मानवाचे जीवन नखशिखान्त चुकीचे ठरेल, जो वस्तुस्थितीच्या विरुद्ध दुसऱ्यांचे शासकत्व मान्य करून किंवा स्वत: आपण शासक असल्याचा दावा करून कार्य करील. वस्तुस्थितीला या गोष्टीची गरज नाही की तुम्ही बुद्धीला पटवून घ्याल तरच ती सत्य ठरेल. नव्हे, तुम्ही स्वत: याबाबत गरजवान आहात की हिचा नीट परिचय करून घ्यावा, मग आपल्या प्रयत्न व कर्मास यानुसार करावे. जर तुम्हाला वस्तुस्थिती जाणवत नाही आणि एखाद्या चुकीच्या गोष्टीला सत्य समजून बसलात तर यात नुकसान तुमचेच आहे.

अल्लाहकरिता इमान राखणे आणि अल्लाहकरिता मुस्लिम होणे

हे भाषण इंदोर शहराच्या एका मोठ्या संमेलनात केले गेले होते, जे नंतर टेपच्या सहाय्याने संकलित केले गेले. म्हणून यात मामुली वाढ झाली आहे.

सर्वशक्तिमान अल्लाहची प्रशंसा आणि त्याचे प्रेषित आदरणीय मुहम्मद (स.) यांच्यावर शांती व समृद्धी असो.

प्रिय मित्रांनो!

मला यावेळी इस्लामची ती वास्तविकता वर्णन करायची आहे, जी कुरआनचे स्पष्ट आयती (संकेत) आणि पैगंबरांच्या आदर्श आचरणाद्वारे अनावरित होऊन समोर येते.

प्रेषित (स) यांनी फर्माविले, ''इस्लामचा आरंभ अनोळख्या अवस्थेत झाला आणि लवकरच अनोळखी होईल.'' आज आपण पाहत आहात की प्रेषित (स) यांनी सांगितल्यानुसार आम्ही याच स्थितीला तोंड देतोय. स्वत: मुस्लिम असलेल्या व्यक्तीला हे सांगावे लागते की इस्लाम धर्म असा आहे.

ज्या काळात इंग्रज साम्राज्याचे या देशावर वर्चस्व होते त्यावेळी मुस्लिम जनसमूह आणि त्याची धार्मिक संस्कृती दोघीही तारुण्यावस्था पार पाडून वृद्धावस्थेच्या द्वाराप्रत पोहोचल्या होत्या. अनेक आजार त्यांना जडले होते. संघर्ष आणि प्रयत्नांमधील आत्मा नाहीसा झाला होता. खालपासून वरपर्यंत सर्वसामान्य स्वभाव उष्टे (दुसऱ्याने बाकी सोडलेले) खाणारा बनला होता. त्या काळात आधुनिक युरोप शतकांच्या झोपेनंतर जागा झाला होता आणि दीर्घ ओढाताणीनंतर या योग्यतेचा झाला होता की युरोपमधून बाहेर पडल्यावर राष्ट्रांच्या देहांवर व मन-मस्तिष्कांवर विजय प्राप्त करू शकेल. म्हणून आधुनिक युद्धसामग्रीसह आधुनिक विचार व दृष्टिकोनांची शक्ती आणि विकसित राजकीय

डावपेच घेऊन तो पुढे झाला. हे नियमाला धरून आहे की सशस्त्र शक्तिसामर्थ्य घेऊन जे दृष्टिकोन हल्ला चढवितात ते सहजगत्या वर्चस्व प्राप्त करतात. दुसऱ्या कोणत्याही जनसमूहाजवळ तर वैज्ञानिक शैलीत क्रमबद्ध अशी एखादी संस्कृती नव्हती.

इस्लामी संस्कृती निश्चितच या स्वरूपाची आहे, जी मुळापासून शिखरापर्यंत अतिशय क्रमबद्ध आणि सुसंघटित आहे. परंतु ज्से मी याआधी सांगितले की याला धारण करणारे थकले होते. त्यांच्या अंगी काही अपवाद वगळता ना मनांना जिंकण्याची पात्रता राहिली होती, ना सृष्टीला आपल्या काबूत करण्याची.

या थकल्याभागल्या जनसमूहाशी पाश्चिमात्य राष्ट्रांपैकी एका तरुण राष्ट्राचा मुकाबला झाला आणि याचा परिणाम तोच झाला, जो असमान शक्तींच्या दरम्यान झालेल्या मुकाबल्यांचा होत असतो. यानंतर गुलामीचे आणखी एक संकट त्यांच्यावर लादले. दारिद्रय व दुष्काळी आणि अपमान व अवहेलनेसह चारित्र्यांना ही गुलामी वाळवीप्रमाणे चाटून फस्त करू लागली. त्याचसोबत विचारधारा बदलल्या आणि जे निकृष्टतम होते, तेच क्रमशः उत्कृष्ट ठरले.

असो. यानंतर ते सातत्याने अवनत होत गेले. मजेशीर बाब अशी की, या अवनतीच्या प्रत्येक अवस्थेवर काही काळ तर दुःखी राहिलेत. मग नंतर याची सवय पडून याला आपले योग्य स्थान समजू लागले. पुढे स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात काही नव्या भावना आणि नव्या विचारांशी यांचा संबंध आला, ज्यांनी यांना अनेक गटांत विभागून टाकले. येथपावेतो की देश स्वतंत्र झाला आणि स्वातंत्र्यानंतर एका दुसऱ्या प्रकारच्या समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागले.

इंग्रजांच्या काळात जेव्हा यांच्या मन-मस्तिष्कात नास्तिकवादी आणि भौतिकवादी विचार व दृष्टिकोन ठसवले गेले तर या हल्ल्याने त्यांना नास्तिक तर बनविले नाही; किंबहुना शंका-संशयाच्या रोगात जरूर ग्रस्त केले. वास्तविक यांच्या धर्माची संपूर्ण इमारत विश्वासाच्या मजबूत आधारशिलेवर उभारली गेली आहे आणि ती विश्वासाच्याच आधारशिलेवर कायम राहू शकते.

आणखी एक संकट असे कोसळले की इ.स. १८५९ मध्ये राणी

व्हिक्टोरियाची प्रसिद्ध घोषणा धार्मिक स्वातंत्र्याने यांच्या दीन-धर्माला संकुचित करून मयार्दित केले. या घोषणेचा लाभ थोडक्यात हा होता की देशावर तर आमचा कायदा चालेल. तथापि, तुमच्या धर्माचरणात हस्तक्षेप केला जाणार नाही आणि तुमचे वैयक्तिक मामले तुमच्या धर्मानुसार ठरतील. या गरजेपोटी एक कायदा बनविला गेला, ज्याचे नाव 'मुस्लिम पर्सनल लॉ'असे आहे.

या धार्मिक स्वातंत्र्याच्या घोषणेने एकीकडे तर या देशात मुस्लिमांना ते स्थान प्रदान केले, जे इस्लामी शासन यंत्रणेत मुस्लिमेतरांचे असते. दुसरीकडे धर्माच्या कल्पना व कक्षेला फार लहान क्षेत्रात मर्यादित केले. धर्माच्या या मर्यादिततेबाबत सुरुवातीला तर मुस्लिमांनी आक्रोश केला, परंतु हळूहळू प्रथम सहन केल्यानंतर चालवून घेतले, नंतर पसंत केले आणि आता अवस्था अशी झाली आहे की यांच्यासमोर जेव्हा धर्माची वास्तविक आणि व्यापक कल्पना मांडली जाते तेव्हा त्यांच्या लक्षात येत नाही की ही काय भानगड आहे? चिडून जाऊन ते विचारतात की हा काय प्रकार आहे? आणि तुम्ही धर्माचे पावित्र्य ऐहिकतेच्या घाणीत का म्हणून घाणेरडे करता? दुसऱ्या शब्दात त्यांचे म्हणणे असे की, तुमच्यासाठी योग्य हेच की या नाशिवंत जगाला दुसऱ्यांसाठी सोडून, उपासना व जप-ताप करण्यात मग्न राहा. या धार्मिक रंगात रंगलेल्या ऐहिक गोष्टी, ज्या तुम्ही सांगता ही सरळ ऐहिकता, दुनियादारी आहे. या जगाची आसक्ती आहे, जी मोठी तिरस्कृत आहे. प्रेषित (स) यांनी व त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनी जे हे कार्य केले कारण त्यांचे विशिष्ट स्थान होते.

तुमच्या अंगी हे सामर्थ्य नाही की तुम्ही हे कार्य हाती घ्यावे. जप-तप आणि गौण उपासनेच्या माध्यमाने आपल्या ईश्वराला राजी करा. जेव्हा तो राजी होईल तेव्हा त्याने पाठविलेले दूत हे काम करतील. जप-धारणांद्वारे तुमच्यात हे सामर्थ्य निर्माण होईल की जेव्हा तुमचा एखादा समूह हिंस्र पशूंच्या एखाद्या जंगलात दाखल होईल तेव्हा ते पुकारतील, हे जंगल तुम्ही खाली करा. त्यानंतर हे दिसेल की सर्व हिंस्र प्राणी भयभीत होऊन पळ काढत आहेत.

परंतु याचा अर्थ असा नव्हे की, मुस्लिमांमधून श्रद्धा, सत्कर्म, विशुद्ध एकेश्वरवादाची कल्पना अगदी नाहीशी झाली आहे. मोठमोठे ईशभिरू विद्वान

अल्लाहच्या कृपेने हजर राहिलेत आणि आजही आहेत. आपल्या धर्मासाठी प्राणार्पण करण्याची भावनादेखील अल्लाहच्या कृपेने पूर्वीही होती आणि आजही आहे. ज्याचे विविध नमुने जगासमोर येत राहिलेत. विशेषत: स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या जनसमूहाने मोठ्या कठीण परिस्थितीचा मुकाबला केला आहे. हे पाहून जाणकार मुस्लिमेतरही नवल करतात. फक्त एवढी कमतरता आहे की, ज्या गोष्टींना ते धर्माशी संबंधित समजत नाहीत त्यांच्या बाबतीत त्यांच्या अंगी एखादे चैतन्य का निर्माण व्हावे ?

आमच्या भोपाळचा एक किस्सा आहे. जेव्हा राज्याची राजधानी भोपाळ होती, तिथल्या एका शाळेत युरोपियन मुख्याध्यापिका होती. शाळेची साफसफाई होत असताना तिच्यासमोर कुरआनातील काही जीर्ण पाने रद्दीसोबत फेकली गेली. यावर काही मुस्लिमांनी तिच्याजवळ तक्रार केली. तिने या गोष्टीला काहीच महत्त्व न देता त्यांना कडवट शब्दात उत्तर देऊन परतविले. साऱ्या शहरात याची चर्चा झाली. हे ऐकून बनेखान नावाच्या एका मामुली मुस्लिमाने लगेच जाऊन तिला गोळी मारून ठार केले. बनेखानवर खुनाचा खटला चालला. त्याने अपराध मान्य केला. मग परिणामी अभिमान व आनंदासह त्याने प्राणार्पण केले. ज्या शैलीत त्याने प्राणार्पण केले ते पाहता खात्रीने वाटते की त्याची कैफियत काहीशी अशी असेल -

''मरणात खरोखर जग जगते
आधी मरण अमरपण मग येते''

त्या गरीब बिचाऱ्या माणसाला फक्त एवढेच माहीत होती की, पवित्र कुरआनच्या जीर्ण पानांना रद्दी समजून फेकून देणे पवित्र कुरआनचा अवमान आहे. याच कारणास्तव त्याने आपल्या प्राणाची आहुती दिली. जर त्याला हे माहीत असते की हा अवमान तर कमी आहे, याहून जास्त अवमान हा आहे की, कुरआनला कर्म किंवा आचरणदृष्ट्या कर्मशून्य करून टाकले आहे. तेव्हा तुम्ही स्वत:च विचार करा. तर त्याची काय अवस्था झाली असती आणि आता या जर्जर अवस्थेतही जर मुस्लिम जनसमूहावर ही गोष्ट स्पष्ट होईल की पवित्र कुरआन खरे पाहता आदेश लागू करण्याकरिता आहे आणि आता ते सर्व कार्यबाह्य

आहेत. त्यांना केवळ आचरणातच आणले जात नाही तर त्यांचा गळा दाबण्याची तयारी होत आहे. तेव्हा आपण अनुमान लावू शकता की या क्षीण जनसमूहातून असे कितीतरी बनेखान निघतील.

ही परिस्थिती पाहता हे कथन अगदी योग्य ठरेल की बहुसंख्य मुस्लिमांची मने आजारी आहेत आणि त्यांची बुद्धीदेखील. मनाने आजारी मी त्या लोकांना म्हणतो की, या महाशयांना चांगले माहीत आहे की वस्तुस्थिती काय आहे, विशुद्ध एकेश्वरवाद काय आहे, त्याच्या अत्यावश्यक निकडी कोणत्या आहेत आणि काळाची गरज काय आहे. या सर्व गोष्टी ते चांगल्या प्रकारे जाणतात. परंतु या बिचाऱ्यांचे धैर्य खचले आहे.

सर्व विश्वाचे कृपानिधी प्रेषित (स) यांची अशी कथने ते स्वत: वाचतात व दुसऱ्यांनाही शिकवितात. उदाहरणार्थ, 'जन्नत (स्वर्ग) अनिच्छा व अनासक्तीने पूर्ण गोष्टींनी झाकून टाकलेली आहे.' परंतु या गोष्टींना सहन करण्याचा उत्साह त्यांच्या अंगी राहिला नाही. ते पवित्र कुरआनचा पाठ देतात आणि चांगल्या प्रकारे जाणतात की, पवित्र कुरआननुसार नमाज, रोजा, हज आणि जकात धर्माचे आधारस्तंभ आहेत. परंतु श्रद्धाशीलतेची कसोटी मात्र नव्हे. श्रद्धाशीलतेची कसोटी तर धर्माला कायम करण्याच्या प्रयत्नांमध्ये जीवाची बाजी लावणे, परंतु ही यांच्याकरिता मोठी जीवघेणी गोष्ट आहे.

म्हणून आपल्या कमजोरीस मोठ्या दिलाने मान्य करण्याऐवजी आपल्या विवेकास गोड भ्रमात ठेवत आहेत. अल्लाह करो, ते या गोड भ्रमात नेक इरादा राखणारे ठरोत.

रोगग्रस्त बुद्धीचे मी मुस्लिमांच्या त्या मोठ्या संख्येला म्हणतो, ज्यांच्या छातीत तळमळणारी हृदये स्पंदन करीत आहेत. त्यांच्या अंतर्मनातून बाहेर पडण्याकरिता गीत अधीर आहेत. परंतु खेदाची गोष्ट अशी की, कोणी साज छेडणारा वादक नाही. गरिबी, नैराश्य, संकटे, अडचणी, दंगेधोपे इत्यादी यांना झोपेत ठेवणाऱ्या गोष्टी नव्हेत; किंबहुना काही गोष्टी तर जागृत करणाऱ्या आहेत. त्यांना गुंगीत ठेवणाऱ्या, धर्माच्या मर्यादित कल्पनेवर समाधान, धार्मिक लोकांच्या पावित्र्य

वर्णनात अतिशयोक्ती, समाजाच्या नेतेमंडळींनी दिलेले घोषवाक्ये (नारे), शासनाकडून दिली जाणारी आश्वासनांची मृगजळे आणि अशीच इतर भ्रम स्वप्ने. ह्या सर्व गोष्टी मुस्लिमांना निद्रिस्त स्थितीत ठेवत आहेत.

मी पुन्हा सांगतो की, हे सर्वसामान्य मुस्लिम जे प्रत्येक प्रवचनात टीकेचा विषय बनले आहेत, जर त्यांना वस्तुस्थितीशी परिचित केले जाईल आणि श्रद्धेच्या प्राथमिक निकडींना ते जाणून घेतील तर अल्लाहच्या साहाय्याने स्वत: आपले व आपल्या जनसमूहाचे भविष्य दिवसरात्र मेहनत करून बदलून टाकतील आणि त्यांच्या कृती व आचरणास पाहून हे जग आश्चर्याने विचार करू लागेल की या जनसमूहाच्या मृतप्राय शरीरांमध्ये कोणते इंजेक्शन लावले गेले आहे की त्यांच्यातून जीवनप्रवाह फोफावून वाहत आहेत.

बांधवांनो ! या गुंतागुंतीच्या परिस्थितीत आणि विमनस्क विचारांमध्ये नजरेपुढचे धुके साफ करण्यासाठी आणि सत्य-वचन स्पष्ट करण्याच्या उद्देशाने एका मोठ्या धर्म आवाहकाच्या धार्मिक अंतर्दृष्टीने समस्त मानव विश्वाला, धार्मिक दृष्टिकोनाने ही गोष्ट समजाविण्याकरिता चार भागात विभागून दाखविले आहे -

- अल्लाहखेरीज इतरांवर श्रद्धा ठेवणारे आणि इतरांचेच आज्ञाधारक व एकनिष्ठ.
- इतरांवर श्रद्धा राखणारे आणि अल्लाहचे आज्ञापालन करणारे.
- अल्लाहवर श्रद्धा राखणारे आणि इतरांचे आज्ञापालन करणारे.
- अल्लाहवर श्रद्धा राखणारे आणि अल्लाहचेच आज्ञापालन करणारे.

पहिल्या प्रकारात सर्व मुस्लिमेतर येतात. अर्थात अल्लाहला सोडून इतरांवर श्रद्धा राखतात आणि इतरांचेच आज्ञापालन करतात. श्रद्धा व आज्ञापालनासंदर्भात त्यांचा अल्लाहशी काडीमात्र संबंध नसतो.

दुसरा प्रकार त्यावेळी अस्तित्वात नव्हता, जेव्हा इस्लामी शासन होते. अर्थात जगावर अल्लाहचा आदेश एका निर्णायक सामर्थ्यासह चालत होता. त्यावेळी या प्रकारात इस्लामी राज्यातील मुस्लिमेतर येत होते. जे अल्लाहवर श्रद्धा तर ठेवत नव्हते; परंतु देशाचा कायदा ईश्वरी कायदा होता म्हणून ते लोक

जीवनाच्या मोठ्या भागात अल्लाहचे आज्ञाधारक व मुस्लिम होते. त्यांचे व्यक्तिगत जीवन अवश्य ईश्वरी कायद्याबाहेर होते; परंतु देशाचा कायदा जो ईश मार्गदर्शनावर आधारित होता, त्यांच्यावरही लागू होता.

तिसऱ्या प्रकारात आजच्या काळातील मुसलमान येतात. अर्थात आम्ही श्रद्धा तर अल्लाहवर राखतो, परंतु जीवनाच्या फार मोठ्या भागात अल्लाहला सोडून इतरांचे आज्ञापालन करतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर आजच्या काळातील प्रत्येक राजकीय व्यवस्थेत आमची पात्रता तीच आहे, जी इस्लामी राज्यव्यवस्थेत मुस्लिमेतरांची होती. आजच्या काळात आमचे स्थान आणि इस्लामी राज्यव्यवस्थेत मुस्लिमेतरांचे स्थान यात फरक कोणता ? याप्रसंगी यावर चर्चा करणे विषयाला धरून होणार नाही. परंतु एका फरकाशी तर अलीकडे उघडरीत्या संबंध येत आहे. तो तर ऐका. इस्लामी शासन आपल्या अधीन असलेल्या मुस्लिमेतरांना हे नाही सांगत की, तुमच्या धार्मिक निकडी कोणत्या आहेत आणि कोणत्या नाहीत ? निधर्मी राज्यव्यवस्था आमच्या धर्माच्या मर्यादा स्वत: निर्धारित करून आम्हाला त्यांचे पालन करण्याचा आदेश देते. (हा फरक तर निधर्मी राज्यव्यवस्थेचे वैशिट्य आहे.)

इस्लामी शासन त्या ग्रंथांचे स्पष्टीकरण स्वत: करणार नाही, ज्यावर शासनाधीन असलेले मुस्लिमेतर श्रद्धा राखत असतील. लोकांमध्ये चर्चा-विवादाचा विषय म्हणून याविषयी बोलणी होणे वेगळे. परंतु सरकारचा कोणताही जबाबदार अधिकारी आपल्या पदाचा वापर करून कधीही तौरेत, इंजील किंवा वेद-गीता वगैरेंचा अर्थ सांगणार नाही. परंतु निधर्मी शासनाचा एक मुस्लिमेतर न्यायाधीश आपल्या न्यायालयीन निर्णयात आमच्या धर्मग्रंथाचा ज्यावर आम्ही श्रद्धा ठेवतो, त्याचा अर्थ आम्हाला सांगतो. एवढेच नव्हे तर हेतूनुसार आमच्या मामल्यात निर्णय करतो.

चौथ्या प्रकारात त्या सर्व लोकांचा समावेश होतो, जे अल्लाहवरच श्रद्धा ठेवतात आणि कृती व आचरणाने अल्लाहचेच आज्ञाधारक व मुस्लिम आहेत. आत्मा आणि इच्छा-अभिलाषांचे वर्चस्व असणे एक वेगळी गोष्ट आहे. परंतु त्यांच्यावर ईश्वराखेरीज दुसऱ्या कोणाचा हुकूम जोरजबरदस्तीने चालणार नाही.

अल्लाहला सोडून ते इतर कोणाच्या आज्ञापालनासाठी विवश होत नाहीत. जामंनीवर चित्र असे आहे की, अल्लाहचे मार्गदर्शन आणि त्याचा आदेश सामर्थ्याने लागू केला जावा. परंतु कोणालाही अल्लाहवर श्रद्धा राखण्याकरिता भाग न पाडले जावे. सर्व व्यवहार त्याच्या मार्गदर्शनानुसार पार पाडले जावेत. खटल्यांचे निकाल त्याने निर्धारित केलेल्या कायद्यानुसार ठरले जावेत. व्यक्ती, वैयक्तिकरीत्याही अल्लाहच्या हुकुमाचा ताबेदार व मुस्लिम असावा आणि इतर लहानसहान आज्ञापालनेही एका मोठ्या आज्ञापालनाच्या अर्थात अल्लाहच्या हुकुमाधीन असावा.

असे नसावे की, अल्लाहच्या आदेशांची अंमलबजावणी लोकांच्या होकारावर अवलंबून असावी. उदाहरणार्थ, जर एखादा मनुष्य दुसऱ्या कोणावर व्यभिचाराचा आरोप ठेवून त्याच्या प्रतिष्ठेला कलंकित करीत आहे. आपण मात्र एवढेच करू शकता की त्याला ईश्वराचे भय दाखववावे, त्याला समजावून सांगावे की बाबा रे, ही गोष्ट सभ्यतेच्याही विरुद्ध आहे. त्याने मानले तर फार चांगले. तुम्ही त्याचे आभार मानावेत.

आणि जर त्याने मानले नाही तर तो जाणो आणि त्याचा ईश्वर. तुम्ही त्याला ईश्वराच्या हवाली करून ''भलाईचा आदेश द्या आणि वाईट गोष्टींपासून रोखा'' या कुरआनातील आदेशाच्या पालनाकरिता दुसऱ्या एखाद्या भल्या माणसाचा शोध घ्या. आजच्या परिस्थितीत तुम्ही असे करू शकत नाही की हंटर किंवा कोडा हातात घेऊन एखद्याशी बोला. तो हा हंटर किंवा कोडा पाहूनच थरथर कापेल. परिणामी लोकांची मानप्रतिष्ठा त्याच्यापासून असुरक्षित राहील.

पहिल्या तीन प्रकारच्या अवस्था कुरआननुसार मानवांच्या निर्मात्या स्वामीला पसंत नाही आणि कुरआनच्या अनुसार अशी अवस्था उपद्रवाची अवस्था आहे. आपल्या दासांसोबत मेहरबानी व दया इच्छिते की चौथ्या प्रकारची माणसे अस्तित्वात यावीत. त्यांची दास्यत्व भावनादेखील त्याची उपासना करण्याचे समाधान ठरावे आणि सांसारिक मामल्यातही त्यांच्या आज्ञापालनाचे शिर त्याच्याच पुढे झुकावे. अल्लाहखेरीज दुसऱ्या कोणाचाही हुकूम त्यांच्यावर जोरजबरदस्तीने चालणारा नसावा. त्यांनी खऱ्या अर्थाने आणि परिपूर्ण स्वरूपात आपल्या ईश्वराचे नायब (प्रतिनिधी) बनून त्याची मर्जी स्वत:वरही लागू करावी आणि लोकांवरही.

या चौथ्या प्रकारच्या माणसे घडविण्याच्या हेतूने समस्त प्रेषित आणि अंतिम प्रेषित मुहम्मद (स) अलैही वसल्लम यांना पाठविले गेले. ईश ग्रंथ अवतरित केले गेले आणि जे लोक अशा प्रकारे आपल्या स्वामी पालनकर्त्याचे दास्यत्व पत्करून त्याच्या आज्ञापालनासाठी तत्पर होऊन त्यांनी प्रेषितांवर इमान राखले. त्यांचे हे कर्तव्य ठरते की या प्रयत्नास्तव आपल्या प्राणवित्ताची बाजी लावावी, ज्या प्रकारे अल्लाहची मर्जी आकाशांमध्ये चालते तशी ती भूतलावर चालावी. यासाठी की याची सुबत्ता व समृद्धी पाहून, त्या लोकांनाही जर त्यांनी इच्छिले तर जन्नतचा मार्ग लाभेल, ज्यांनी अल्लाह आणि प्रेषितांवरही इमान राखले नसावे, या प्रयत्नात इमानधारकाच्या श्रद्धेची कसोटी होते.

कुरआन आणि प्रेषित आचरणाला दृष्टिपथात ठेवणार प्रेषित (स) यांचे सहकारी सांगतात की, हे कर्तव्य पार न पाडण्याच्या कमतरतेला उपासना व गौण उपासना, जप-तापाची अधिकता पूर्ण करू शकत नाही. प्राण-वित्त, पणाला लावल्या जाणाऱ्या या कर्तव्यापासून तोंड फिरविल्याने उपासना व जप वगैरेंची स्वीकृती साशंक ठरते. जेव्हा माणसाने या चौथ्या प्रकारात दाखल होण्यासाठी ईश्वरासमोर शरणागती पत्करली. ला इलाह इल्लल्लाहच्या शब्दांत ईश्वरापुढे दास्यत्वाचा वचन करार केला आणि जन्नतच्या मोबदल्यात राजीखुशीने आपल्या तन-मन-धनाचा सौदा केला. तेव्हा याचा प्राण, याची संपत्ती याची स्वत:ची राहिलीच कोठे की तो अर्पण करण्यात त्याने बहाणा करावा ? हा प्राण आणि ही मालमत्ता सदैव याच्या कब्ज्यात तर राहणार नाही. जर तो ईशमार्गात याला न वापरता वाचवील, ज्याच्या हाती त्याने हा विकण्याचा करार केला आहे तर दुसरे लोक त्यांना घेऊन पळतील. कारण कोणत्या ना कोणत्या आज्ञापालन व्यवस्थेविना मनुष्य जिवंत राहू शकत नाही आणि प्रत्येक आज्ञापालन व्यवस्था आपल्या अधिकाराखालील लोकांकडून आज्ञापालनही इच्छिते, एकनिष्ठताही इच्छिते आणि सर्वस्वाचे बलिदानही इच्छिते. तरीही एक दिवस यांना या जगातून जावे लागणारच आहे.

बंधूंनो ! मी हे जे सांगितले की या काळात मुस्लिम विविध प्रकारच्या विचार व दृष्टिकोनाच्या जंगलात हरवले आहेत. काहींची मने आजारी तर काहींची

बुद्धी. याचे एक कारण असेही आहे की, या काळातील आधुनिक व शक्तिशाली सैतान नावरूप बदलून मुस्लिम जनसमूहात दाखल झाला आहे. म्हणून सर्वसामान्य लोक त्याला ओळखत नाही. तो आमच्याशी सहानुभूती आणि हितचिंतकाचे नाटक करीत आमचा पालक बनून बसला आणि आम्ही त्याच्या भूलभुलय्याला बळी पडून आणि त्याच्या वरवर दिसणाऱ्या चकाकीवर भाळून त्याला आपला मायबाप मानून घेतले आहे.

ही एक वस्तुस्थिती आहे की, सत्याचा नीट परिचय करून घेण्यासाठी असत्याचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. परंतु आता या फसवणुकीपासून बचाव करण्याकरिताही आवश्यक ठरले आहे की जेवढा इतमाम आम्ही ईश्वराचा परिचय प्राप्त करण्यासाठी करतो, तेवढाच इतमाम आम्ही सैतानाला ओळखण्याचाही करावा.

पवित्र कुरआनदेखील मागे होऊन गेलेल्या जनसमूहांच्या अनुभवांच्या प्रकाशात लोकांना अतिशय उत्कृष्ट व मनावर ठसणाऱ्या प्रमाणांसह एकेश्वरवादाला सिद्ध करतो. ज्यांच्यावर ईश कोप झाला अशा जातीसमूहांची बोधदायक शोकांतिका प्रस्तुत करून अतिशय प्रबळ प्रमाणांसह अनेकेश्वरवाद आणि नास्तिकता यांचे खंडन करतो. त्याचसोबत स्पष्ट फर्मावितो:-

''दीन-धर्माच्या संदर्भात कसलीही जोर-जबरदस्ती नाही. उचित गोष्ट चुकीच्या विचारांपासून वेगळी छाटून राखली गेली आहे. आता जो कोणी सैतानाचा इन्कार करून अल्लाहवर इमान राखील, त्याने एक असा भक्कम व मजबूत आश्रय धरला जो कधीही तुटणारा नाही.''

(अल् बक़रा - २५६)

पाहा, या ठिकाणी अल्लाहवर इमान राखण्याआधी सैतानाचा इन्कार करण्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सैतानाचा इन्कार केल्याविना इमान परिपूर्ण होत नाही. इमानाची अट आहे की सैतानाचा इन्कार करावा. मग हे की ज्याचा इन्कार करणे, इमान परिपूर्ण होण्यासाठी आवश्यक ठरले, त्याला सर्वश्रेष्ठ अल्लाह साशंक कसे सोडेल. यास्तव त्याने सैतानाची ओळख अशा प्रकारे

करून दिली की कसलीही शंका राहत नाही आणि सैतानावर निर्भर्त्सना पाठवून अर्थात त्याला फक्त धूत्कारून संतुष्ट होण्याचा कसलाही वाव राहत नाही. आणि म्हणूनच तो फर्मावितो -

''(हे पैगंबर) काय तुम्ही पाहिले नाही त्या लोकांना, जे दावा तर करतात की आम्ही इमान राखले आहे त्या ग्रंथावर जे तुमच्याकडे अवतरित केला गेला आहे आणि त्या ग्रंथांवर जे तुमच्या पूर्वी अवतरित केले गेले होते. परंतु इच्छितात हे की आपल्या मामल्यांचा फैसला करण्याकरिता सैतानाकडे रुजू करावे. वास्तविक यांना सैतानाचा इन्कार करण्याचा आदेश दिला गेला होता.''

(अन् निसा - ६०)

जर सैतानाचेच दुसरे नाव 'तागूत' आहे तर प्रत्येक मनुष्य समजू शकतो की सैतान एखादी सभा मांडून बसला नाही. जिथे लोक आपल्या मामल्यांचा फैसला करण्याकरिता जात असावेत. तो हाडामांसाचा मनुष्यच आहे जो ईश मार्गदर्शनापासून मुक्त होऊन बनावटी कायद्यांच्या अनुसार मामल्यांचा व खटल्यांचा निर्णय करतो.

आणि ही गोष्ट सांगितल्याविना उघड आहे की, ज्याप्रमाणे तोंडाने 'मी अल्लाहवर इमान राखतो' असे म्हटल्याने भागत नाही. या वचनाच्या कर्मविषयक निकंडींना पूर्ण करणे आवश्यक आहे. तद्वतच केवळ तोंडाने सैतानाचा धिक्कार करणे पुरेसे ठरत नाही. कृती किंवा आचरणाने त्याच्यापासून अलिप्तता राखणे आवश्यक आहे आणि हेच ते स्थान होय, जिथून श्रद्धेच्या कसोटीला आरंभ होतो.

बंधूंनो! सांगण्याचे तात्पर्य हे की, जसे आता सांगितले गेले. चार प्रकारांपैकी चौथ्या प्रकारची माणसे बनविण्याकरिताच ईश ग्रंथ अवतरित केले गेले आणि प्रेषितांना पाठविले गेले आणि आता जेव्हा ईश ग्रंथांच्या अवतरण्याचा व प्रेषितांच्या आगमनाचा क्रम समाप्त झाला आहे. ही जबाबदारी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या अनुयायांची आहे की त्यांनी ही सेवा पार पाडावी. मुस्लिम जनसमूहाच्या प्रत्येक व्यक्तीचे हे कर्तव्य आहे की तिने स्वतः अल्लाहवर इमान राखावे आणि

अल्लाहचेच आज्ञाधारक बनावे आणि सामुदायिकरीत्या समस्त मुस्लिम संप्रदायाचे हे कर्तव्य ठरते की त्याने अशा विश्वाच्या उभारणीस लागावे, ज्यात एखाद्यास वाटले तर अल्लाहवर इमान राखणारा व्हावे व अल्लाहचाच दास व आज्ञाधारक बनावे. अल्लाहला सोडून इतरांचा दास व आज्ञाधारक बनण्यास विवश न राहावे.

आणि जे लोक एकत्रितपणे हे कर्तव्य पार पाडतील आणि आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यास सत्य-धर्माच्या चौकटीत बसवून त्या प्रत्येक अपेक्षेपुढे नतमस्तक होणारे होतात, जी अपेक्षा यांचा धर्म करीत आहे. अशाच माणसांच्या समुदायाचे नाव 'जमाते इस्लामी' आहे, ह्या संघटनेसोबत मिळून प्रत्येक मनुष्य आपल्या धर्म व इमानविषयक निकडी पूर्ण करू शकतो.

शेवटी हे की, स्वत: आपली व लोकांची ही सेवा इमानाची निकड तर आहेच, पण आता काळाचीही गरज ठरली आहे आणि कोणत्याही परिस्थितीत हा सत्याचा पुकार बंद व्हावयास नको. परंतु आता सुदैवाने व सत्प्रेरणेने सत्याचा सूर्य उदयास येत आहे आणि जग आपल्या पायांनी चालत येऊन एकेश्वरवादाच्या जवळ आले आहे.

विविध ज्ञानांच्या माध्यमाने होणाऱ्या रहस्योद्‌घाटनांनी ती सत्ये माणसांना उलगडून दाखवली आहेत. त्यानंतर सत्याचा इन्कार करणे कठीण झाले आहे आणि शतकापूर्वी सत्य स्वीकृती जेवढी कठीण बाब होती तेवढी कठीण आता राहिली नाही. परंतु ही तपशिलाची बाब आहे. तिचे वर्णन करणे विद्वान, संशोधकांचे काम आहे. साधी-सरळ व सर्वांच्या आकलनात येणारी गोष्ट अशी की, विशुद्ध मनाने व निकोप बुद्धीने थोडे ध्यान दिल्यास ही गोष्ट समोर येते की मानवाला सन्मार्गापासून हटविणाऱ्या आणि वेगवेगळ्या दऱ्याखोऱ्यात भटकविणाऱ्या दोन गोष्टी आहेत. एक इच्छा-अभिलाषा व दुसरी लज्जत आणि ऐहिकता किंवा ऐहिक भक्ती. त्यांना नियम बनवून समाज व राज्याची रचना केली ज़ाते आणि 'निधर्मवाद' हे नाव ठेवले जाते.

या इच्छा-अभिलाषा व ऐहिकता जेव्हा धार्मिक शैलीत आपला जोर दाखविते तेव्हा मानवासारख्या सर्वश्रेष्ठ ईशनिर्मितीकडून झाडा दगडांना आणि काल्पनिक

चीजवस्तूंना साष्टांग दंडवत घालवते. तो अनेकेश्वरोपासनेच्या गर्तेत खोलवर जाऊन अशा त्या प्रत्येक वस्तूपुढे माथा टेकतो, जी काही लाभ-हानी पोहोचविणारी वाटते. दुसरीकडे याच इच्छा-अभिलाषा ऐहिक भक्ती आणि लज्जत जेव्हा ज्ञान आणि तत्त्वज्ञानाने सुशोभित होतात, तेव्हा काही नियम बनवून, माणसाच्या मन-मस्तिष्कावर ताबा मिळवून त्याला आपला पुजारी बनवतात. याला विचारस्वातंत्र्याच्या नावाने मातापिता आपल्या मुलांना मुक्त इच्छा-अभिलाषांचा गुलाम बनवितात.

इथे पोहोचून मनुष्यस्वभाव दोन कार्ये करतो एक हे की, माणसाच्या स्वभावात जी सत्यप्रियता भिनलेली आहे, ती आपली शक्ती लावते. दुसरे हे की, इच्छा व स्वादांच्या समुद्रात नग्न होऊन बुडण्याची ही प्रतिक्रिया होते व याच लज्जतींचा तो वेडा बनला जातो, त्याचे मन भरून जाते. मी मन भरण्याशी अभिप्रेत तृप्त होणे असे सांगत नाही. कारण इच्छा-आसक्तीने बेलगाम होऊन कधीही तृप्ती लाभत नाही. उलट तृष्णा अधिक वाढते. माझ्या मते, मन भरणे म्हणजे उबग येणे, गोडी न राहणे.

या कैफियतीचा चालताफिरता नमुना हिप्पी लोक होत. इच्छा-आकांक्षांमध्ये आकंठ बुडाल्यानंतरची उद्विग्नता व बेचैनी आणि त्याद्वारे भडकणाऱ्या आगीने भल्या चांगल्या सुसंस्कृत माणसाला हिप्पी बनवून टाकले. या कैफियतीने बहुतेक लोकांचे शांती-समाधानाच्या शोधात या गोष्टीकडे लक्ष वेधले, ज्याला सर्वसामान्यपणे आध्यात्मिकता म्हटले जाते. मानसिकतेच्या वळणावर अनेक सुसज्ज व सुशोभित आध्यात्मिकतेची दुकाने दिसू लागली. कारण यांच्यासमोर आध्यात्मिकता किंवा मन:शांतीची कसलीही स्पष्ट कल्पना तर नाही. फक्त एक आंधळी इच्छा आहे. याच कारणास्तव हे लोक आध्यात्मिकता विकणाऱ्या दुकानदारांच्या चतुराईला बळी पडून विनोदाचा विषय किंवा बोधसामग्री बनलेत.

हे जे मोठमोठे नेते, विचारवंत आम्हाला जादूमंत्रांच्या जाळ्यात अडकलेले दिसतात. हा त्याच गोष्टीचा चमत्कार होय. इथे पोहोचून मोठमोठ्या बुद्धिवाद्यांची नास्तिकवादी बुद्धीदेखील एखाद्या अदृश्य शक्तिसामर्थ्याला मान्य करते. अतिशय खालच्या दर्जाच्या अधमतेच्या गर्तेत पडलेल्या माणसासमोर जर एकेश्वरवादावर

विश्वासपूर्वक प्राप्त होणारी शांती आणि ईश मार्गदर्शनाच्या समतोलाने बरसणारी शांती-सुबत्ता लाभेल तर आशा आहे की तो आनंदाने उडी घेईल आणि जीवनामृताच्या प्याल्यास तोंडाशी लावून एकदम पिऊन टाकेल. कारण जिथे स्वातंत्र्य, विचार व कल्पनेने त्याच्या कर्मास आवारा बनविले आहे, तिथेच अनेक प्राचीन आणि अज्ञानपूर्ण भ्रम व प्रथांच्या घेऱ्याने त्याच्या मन-मस्तिष्कास मुक्त केले आहे.

जो धर्मापासून यासाठीच स्वतंत्र आणि नि:स्पृह झाला होता की धार्मिक अधिकार ज्याच्या पाठीशी परंपरांशिवाय कोणतेही योग्य प्रमाण नव्हते. त्याने माणसाच्या विचार व विवेकाला कैद करून त्याला मृतवत बनवून टाकले होते. जेव्हा विचारस्वातंत्र्य एका दुसऱ्या टोकाला पोहोचले, तेव्हा या प्राकृतिक प्रतिक्रियेने एक स्वरूप तर हे धारण केले की व्यक्ती, जी स्वतंत्र होऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या व साधनांच्या बळाने समाजाकरिता एक संकट बनली. समाजाच्या सामर्थ्यास त्याने आपल्या इच्छा-अभिलाषांचा कार्य साधक बनवून ठेवले होते. त्याच्या विचार व कल्पनेवर एका दुसऱ्या प्रकारचे पहारे बसविले गेले. आणि भागीदारीच्या नावाने मानवांचे गट विभागून त्याला एका निर्जीव शस्त्राप्रमाणे संघटित शक्तींच्या हातात दिले गेले.

या प्रतिक्रियेचे एक दुसरे स्वरूप हे समोर येत आहे की माणसाच्या मनात एका अशा गोष्टीची इच्छा निर्माण झाली आहे, जी त्याच्या बेचैन मनाला शांती प्रदान करील. त्याच्या आध्यात्मिकतेची व दास्यत्वाची तहान भागवीत, त्याच्या स्वाभाविक अपेक्षा पूर्ण करेल. त्याचसोबत त्याच्या भौतिक गरजा पूर्ण करण्याचीही हमी देईल.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर एका अशा विश्वासाचा आधार त्याला लाभावा, ज्यामुळे त्याचे डगमगणारे जहाज स्थिर राहावे. उघड आहे की, अशी संमिश्र आचार-विचार व्यवस्था इस्लामखेरीज दुसरी नाही. ना प्राचीन धर्तीचा एखादा धर्म, ना आधुनिक धर्तीचा एखादा वाद (इझम), माणसाच्या प्रत्येक स्वाभाविक मागणीचे उत्तर आणि त्याच्या प्रत्येक स्वाभाविक गरजेची हमी कालही इस्लाम होता, आजही इस्लाम आहे आणि भविष्यातही इस्लामच असेल.

बंधूंनो ! मी हे अगदी संक्षिप्त संकेत केले आहेत. जर तपशिलात जाऊन पाहिल्यास स्पष्ट दिसेल की माणसाच्या मनाची कवाडे खुलण्याच्याच बेतात आहेत. मानवाच्या मानसिकतेच्या या ऐतिहासिक वळणाने आणि क्रिया-प्रतिक्रियाच्या या सार्वभौमिक चक्राने सत्य-आवाहनासाठी मोठा वाव, मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. त्याचसोबत ही संधी सत्य-निष्ठ लोकांसाठी फार मोठी कसोटी बनली आहे.

एक दिवस सत्य-निष्ठ लोकांना विचारले जाईल की जेव्हा प्रकृतीतर्फे सत्याची अभिलाषा आणि सत्य स्वीकृतीची तयारी निर्माण केली गेली होती. तेव्हा तुम्ही कोठे मरून पडला होता ? अल्लाह मलाही आणि तुम्हा सर्वांनाही इतिहासाच्या या अनमोल संधीचा लाभ घेण्याची हिंमत व सुबुद्धी प्रदान करो. कारण संभवत: तुमच्या-आमच्या इमानाची कसोटी घेण्याकरिताच सर्वसामान्य मानवाचे हे स्वरूप बनविले गेले असावे की -

'जंगलातील सर्व हरणे आपले शिर तळहातावर घेऊन आहेत, या आशेवर आहेत की कोणत्या ना कोणत्या दिवशी शिकारीकरिता तुम्ही यावे.'

*** समाप्त ***